# गोपनीय

क्रमांक : का.स./बैठक/२२०

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई - ४०० ०५१.**

दिनांक : ३ ऑक्टोबर, २००७.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १३ सप्टेंबर, २००७ (गुरुवार) रोजी झालेल्या २२० व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

03.10.2007

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

प्रति :

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर,<br>"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,<br>मुंबई - ४०० ०१८. | - | सदस्य |
| श्री.र.य.तांबे,<br>ए-६००, शिवम अपार्टमेंट्स,<br>सुरेंद्रनगर, आरपीटीएस रोड,<br>नागपूर - ४४० ०१५. | - | सदस्य |
| श्री.हरिशंकरन्,<br>कार्यकारी संचालक - इन्फ्रास्ट्रक्चर,<br>इन्फ्रास्ट्रक्चर लिजिंग अँड फिनान्सिअल सर्व्हिसेस लिमिटेड,<br>वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),<br>मुंबई - ४०० ०५१. | - | सदस्य |
| अपर मुख्य सचिव,<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

प्रधान सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२३.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

**निमंत्रित :**

प्रधान सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
# कार्यकारी समितीच्या २२० व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | : | **१३ सप्टेंबर, २००७ (गुरुवार)** |
| **वेळ** | : | **सकाळी ११.०० वाजता** |
| **सभास्थान** | : | **मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२.** |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री.जॉनी जोसेफ<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.र.य.तांबे | - | सदस्य |
| श्री.स्वाधीन क्षत्रीय<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| डॉ.ज.मो.फाटक<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री.रत्नाकर गायकवाड<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री.संजय उबाळे
सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन,

श्री.मिलिंद म्हैसकर
सह-महानगर आयुक्त / प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.के.एन.खवारे
सह-सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन
(प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांचे प्रतिनिधी म्हणून)

डॉ.बी.एन.पाटील
शास्त्रज्ञ-१,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन
(प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांचे प्रतिनिधी म्हणून)

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.ज.स.गिरासे
मुख्य लेखा अधिकारी व वित्त सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मुर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.यु.व्ही.लुकतुके
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

कु.उमा अडसुमिली
प्रमुख, नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.डी.डी.भिडे
मुख्य अभियंता,
मिठी नदी कामे

श्री.श्री.र.नंदर्गीकर
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.सु.मो.रामचंदानी
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.प्र.ह.राऊत
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १६ मार्च, २००७ रोजी झालेल्या २१९ व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

१.१ कार्यवृत्त कायम करण्यासंबंधात खालीलप्रमाणे चर्चा झाली :–

**बाब क्र. ६ : मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या पात्राची रुंदी व खोली (माहिम कॉजवे ते सीएसटी पूलापर्यंत) वाढविणे तसेच मिठी नदी परिसराचा विकास करणे इत्यादींसाठी टप्पा-२ च्या कामांसाठी प्राप्त झालेल्या लघुत्तम निविदांना मान्यता देणेबाबत.**

या बाब क्र. ६ संबंधीत कार्यवृत्ताबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कार्यवृत्तात नमूद केल्याप्रमाणे मिठी नदीच्या कामाच्या ६ निविदांपैकी अ.क्र.१, ३ व ४ येथील कामांच्या लघुत्तम निविदा स्विकारण्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली. त्यापैकी अ.क्र.३ मधील निविदेच्या नावामध्ये चूक झाली असून लहान संगमपासून सी.एस.टी. पूलापर्यंत सा.क्र.१२८०.०० मी. ते ३३००.०० मी. मधील पात्राची रुंदी व खोली वाढविण्याच्या कामाऐवजी धारावी पूल ते लहान संगमपर्यंत सा.क्र.१२८०.०० मी. ते ३३००.०० मी. मधील पात्राची रुंदी व खोली वाढविण्याचे काम अशी सुधारणा करणे आवश्यक आहे.

१.२ वरील सुधारणेसह कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**<u>बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १६ मार्च, २००७ रोजी झालेल्या २१९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.</u>**

२.१ कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालासंबंधात खालीलप्रमाणे चर्चा झाली :–

<u>बाब क्र. १४ : मिठी नदीच्या वांद्रे-कुर्ला संकुलामधील भागाचे (माहिम कॉजवे ते सीएसटी पूल) आणि संपूर्ण वाकोला नाल्याचे टोटल स्टेशन सर्वेक्षण करण्यासाठी मे.युनिक इंजिनिअर्स यांची नियुक्ती करण्यास कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.</u>

श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की, मे.युनिक इंजिनिअर्स यांनी सर्वेक्षणाद्वारे तयार केलेल्या नकाशांची अचूकता तपासून पहाण्यासाठी त्यांच्या नकाशांचे महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाच्या जल आरेखक यांनी तयार केलेल्या नकाशांशी संकलन (Syncronisation) करणे आवश्यक आहे. म्हणून यासंबंधात तातडीने कार्यवाही करुन नकाशांची अचूकता तपासून पहावी.

२.२ त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**<u>बाब क्र.३ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत जोगेश्वरी (उत्तर), जोगेश्वरी (दक्षिण) व विक्रोळी येथील रेल्वे वरपूलांचे सुधारीत अंदाजित खर्चाचे आराखडे, निविदांचे दस्तऐवज इ. तयार करण्याकरीता अतिरिक्त खर्चास मंजूरी देणेबाबत.</u>**

३.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पातील जोगेश्वरी (उत्तर), जोगेश्वरी (दक्षिण) व विक्रोळी येथील रेल्वेवरपूलांसाठी सर्वंकष संकल्पचित्रे, अभियांत्रिकी आराखडे आणि निविदांचे दस्तऐवज तयार करण्याचे काम मे.विल्बर स्मिथ असोसिएटस् या सल्लागारांकडून सन १९९८ मध्ये करुन घेण्यात आले. तथापि, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, भूसंपादन प्रक्रिया इत्यादींमध्ये अडचणी निर्माण झाल्यामुळे अद्याप या प्रकल्पांची अंमलबजावणी झालेली नाही. म्हणून या तीन रेल्वेवरपूलांकरीता सुधारीत अभियांत्रिकी आराखडे, अंदाजित खर्चाचे आराखडे आणि देकारांचे दस्तऐवज तयार करण्यासाठी, कार्यकारी समितीच्या मान्यतेने, पूर्वीच्या करारास मुदतवाढ देऊन रु.२९.८० लाख (अधिक सेवाकर) इतक्या अतिरिक्त फी वर मे.विल्बर स्मिथ असोसिएटस् यांची फेब्रुवारी, २००३ मध्ये

नेमणूक करण्यात आली. सल्लागारांनी सदरहू कामे पूर्ण करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर केली व त्यास जागतिक बँकेची मान्यता मिळाली. त्यानुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेने रेल्वेवरपूलांच्या कामांसाठी जानेवारी, २००६ मध्ये निविदा मागविल्या. तथापि, भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण होत नसल्यामुळे निविदा स्विकारण्याचा दिनांक कंत्राटदारास कळविला नाही. आता निविदा मागवून सुमारे एक वर्षाचा कालावधी लोटल्यामुळे सिमेंट, स्टील इत्यादींच्या किंमतीत वाढ झाली आहे. म्हणून या तीन रेल्वेवरपूलांची सुधारीत अंदाजपत्रके, खर्चाचे आराखडे व निविदांचे दस्तऐवज मे.विल्बर स्मिथ असोसिएटस् यांचेकडून करुन घ्यावेत असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे. या कामासाठी मे.विल्बर स्मिथ असोसिएटस् यांनी रु.१० लाख (सेवाकरासह) इतक्या अतिरिक्त फी ची मागणी केलेली आहे. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, रेल्वेवरपूलांसंबंधीत भूसंपादनाचे ७०% काम पूर्ण झाले असून प्रकल्पबाधित कुटुंबांचे पुनर्वसन प्रगतीपथावर आहे. म्हणून आता या तीन रेल्वेवरपूलांची सुधारीत अंदाजपत्रके, खर्चाचे आराखडे व निविदांचे दस्तऐवज तयार करण्याकरीता करावयाच्या अतिरिक्त कामासाठी रु.१० लाख (सेवाकरासह) इतकी अतिरिक्त फी अदा करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. या कामांसाठी यापूर्वी सल्लागारांवर झालेला खर्च व यापुढे होणारा सर्व खर्च बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून वसूल करण्यात येईल.

३.२ श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली असता श्री.मूर्ती, प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी स्पष्ट केले की, सल्लागारांनी मागणी केलेली रु.१० लाख (सेवाकरासह) ही फी मासिक मनुष्यबळ (Man-month) यावर आधारीत असून या अतिरिक्त फी ची मागणी योग्य आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर मागणी मान्य करण्याची शिफारस केली आहे.

३.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१०४६</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (दोन) व (तीन) अन्वये प्राप्त

झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मे.विल्बर स्मिथ असोसिएट्स यांना मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत जोगेश्वरी (उत्तर), जोगेश्वरी (दक्षिण) व विक्रोळी येथील रेल्वेवरपूलांची सुधारीत अंदाजपत्रके, खर्चाचे आराखडे व निविदांचे दस्तऐवज तयार करण्याकरीता करावयाच्या अतिरिक्त कामासाठी रु.१० लाख (सेवाकरासह) इतकी अतिरिक्त फी अदा करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** हया तीन रेल्वेवरपूलांची सर्वंकष संकल्पचित्रे, अभियांत्रिकी आराखडे, खर्चाचे आराखडे, निविदांचे दस्तऐवज इत्यादी तयार करण्याकरीता सल्लागारांवर यापूर्वी झालेला व यापुढे होणारा सर्व खर्च बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून वसूल करण्यात यावा.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

<u>बाब क्र.४</u> : <u>**प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेच्या पाणी पुरवठयासाठी चेंबूर येथे टर्नकी तत्वावर उदंचन केंद्र बांधणे, यंत्रसामुग्री उभारणे व ती कार्यान्वित करुन त्याचे परिरक्षण करणे या कामाच्या लघुत्तम निविदेस मंजुरी मिळणेबाबत.**</u>

४.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प तसेच मिठी नदीच्या पात्राची रुंदी व खोली वाढविणे या प्रकल्पांमुळे बाधित होणा-या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी अणिक-चेंबूर आणि अणिक-माहूल येथे पक्क्या सदनिकांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन प्रगतीपथावर आहे. या सदनिकांसाठी रस्त्याचे बांधकाम, जलवाहिन्या, मलनिःसारण वाहिन्या इत्यादी बाहय पायाभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिकेची आहे. तथापि, सदरील कामांची निकड व ती तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता विचारात घेऊन सदरील कामे या प्राधिकरणाने करावीत अशी बृहन्मुंबई महानगरपालिकेने विनंती केली

आहे. सदर कामांवरील खर्च उप-विकासकांकडून झोपडपट्टी पुनर्विकास नियमाप्रमाणे उपलब्ध होणा-या निधीतून करावयाचा आहे. त्यानुसार कार्यकारी समितीच्या मान्यतेने प्राधिकरणाने ही कामे हाती घेतली आहेत. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, या कामांपैकी ट्रॉम्बे-चेंबूर येथील निम्नस्तरीय जलाशयालगत उदंचन केंद्र बांधणे, त्यात ६० मीटर उंचीसाठी १२५ लिटर प्रतिसेकंद पाणी फेकण्याची क्षमता असलेले सहा उदंचन संच व इतर उपकरणे बसवून कार्यान्वित करणे ही कामे तातडीने पूर्ण करणे आवश्यक आहे. हे उदंचन केंद्र बृहन्मुंबई महानगरपालिका, शासकीय कारखाने व विद्युत परवाना या संस्थांच्या अटींनुसार बांधावयाचे असल्यामुळे हे काम टर्नकी तत्वावर करण्याचे ठरविण्यात आले आहे. या कामाचा सुधारीत अंदाजित खर्च रु.३२१.८० लाख इतका आहे. या कामासाठी प्रथम एप्रिल, २००६ मध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या. तथापि, प्राप्त झालेल्या निविदा जास्त दराच्या असल्यामुळे, फेब्रुवारी, २००७ मध्ये वृत्तपत्रात जाहिरात देऊन फेरनिविदा मागविण्यात आल्या. एकूण ५ कोरे निविदा संच विकले गेले. विहित कालावधीमध्ये ४ पूर्ण केलेल्या निविदा सादर झाल्या. त्या निविदांची छाननी केली असता तीन निविदाकार पात्र ठरले. त्यापैकी मे.किर्लोस्कर ब्रदर्स लि., पुणे यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.६८% जास्त दराची म्हणजे रु.३,७२,२७,२३०.३७ किंमतीची निविदा लघुत्तम आहे. यासंबंधात वाटाघाटीअंती सदर लघुत्तम निविदाकारांनी त्यांचा देकार कमी करण्यास असमर्थता व्यक्त केली. मे.किर्लोस्कर ब्रदर्स लि. यांचा लघुत्तम देकार हा निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा, सुसंवादी व रास्त असल्यामुळे कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

४.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :--

**<u>ठराव क्र.१०४७</u> :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेच्या पाणी पुरवठयासाठी

चेंबूर येथे टर्नकी तत्वावर उदंचन केंद्र बांधणे, आवश्यक ती यंत्रसामुग्री उभारणे व कार्यान्वित करुन त्याचे परिरक्षण करणे या कामासाठी मे.किर्लोस्कर ब्रदर्स लि., पुणे यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.६८% जास्त दराची म्हणजे रु.३,७२,२७,२३०.३७ (रुपये तीन कोटी बहात्तर लाख सत्तावीस हजार दोनशे तीस व पैसे सदतीस मात्र) किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे. सदर खर्च उप-विकासकांकडून झोपडपट्टी पुनर्विकास नियमाप्रमाणे उपलब्ध होणा-या निधीतून करण्यात यावा.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक १ मार्च, २००७ ते दिनांक ३१ जुलै, २००७**

दिनांक १ मार्च, २००७ ते दिनांक ३१ जुलै, २००७ पर्यंतच्या प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.६ : मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल दिनांक १ ऑक्टोबर, २००६ ते दिनांक ३१ मार्च, २००७.**

मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधीच्या दिनांक १ ऑक्टोबर, २००६ ते दिनांक ३१ मार्च, २००७ पर्यंतच्या व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.७ : महानगर आयुक्तांना प्रशासकीय व आर्थिक अधिकार प्रत्यायोजित करण्याबाबत.**

७.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील विभाग प्रमुखांची पदे वगळून इतर पदांवरील नियुक्त्यांचे

अधिकार कार्यकारी समितीने महानगर आयुक्तांना प्रत्यायोजित केलेले आहेत. प्राधिकरणातील कर्मचारीवर्गाच्या समस्या, प्राधिकरणावर सोपविण्यात आलेल्या विविध जबाबदा-या यांचा विचार करुन या प्रत्यायोजित केलेल्या अधिकाराशी निगडित असलेले काही अधिकार महानगर आयुक्तांना प्रत्यायोजित करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे प्राधिकरणाने मोठया प्रमाणात पायाभूत सुविधा प्रकल्प हाती घेतले आहेत. हे प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने रु.१० कोटीपर्यंत खर्चाचे प्रकल्प व योजना यासाठी प्रशासकीय मंजूरी देऊन निविदा मागविणे व मंजूर करणे, तसेच प्रकल्पाकरीता सल्लागाराची नेमणूक करण्याकरीता निविदा मागवून रु.५० लाखापर्यंत फी देऊन सल्लागाराची नेमणूक करणे, निविदा न मागविता एकमेव स्त्रोत या तत्वावर रु.१० लाख इतक्या फी पर्यंत सल्लागाराची नेमणूक करणे, त्याचप्रमाणे रु.१० लाखापर्यंत निविदा न मागविता पुरवठादाराची/कंत्राटदाराची एकमेव स्त्रोत या तत्वावर नेमणूक करणे आणि प्रत्येक प्रकरणी रु.५० लाखापर्यंत आवर्ती (Recurring) व अनावर्ती (Non-recurring) खर्चास मान्यता देणे यासाठी महानगर आयुक्त यांना अधिकार प्रत्यायोजित करावे अशी कार्यकारी समितीस विनंती करण्यात आलेली आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, प्राधिकरणाचा अतिरिक्त निधी शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राष्ट्रीयकृत बँका / अनुसूचित बँका व वित्तीय संस्था यामध्ये एका वर्षापर्यंतच्या कालावधीसाठी गुंतविण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रत्यायोजित करण्यात आलेले आहेत. तथापि, ब-याच वेळेस १ वर्ष कालावधीपेक्षा १ वर्ष १ दिवस किंवा १३ महिन्यांकरीता बँकांकडून मिळणारा व्याजदर अधिक असतो. या वाढीव व्याजदराचा फायदा घेण्याच्या दृष्टीने राष्ट्रीयकृत बँकांमध्ये १३ महिन्यांपर्यंत आणि अनुसूचित बँका व वित्तीय संस्थांमध्ये एक वर्षापर्यंत प्राधिकरणाचा अतिरिक्त निधी गुंतविण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रत्यायोजित करण्याचे प्रस्तावित केले आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, कार्यकारी समितीने अशाप्रकारे महानगर आयुक्तांना अधिकार प्रत्यायोजित केल्यास प्रत्येक वेळेस कार्यकारी समितीकडे मान्यतेसाठी यावे लागणार नाही व संबंधीत कार्यवाही त्वरेने पूर्ण करता येईल.

..१०/-

७.२ त्यानंतर, प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला : –

**ठराव क्र.१०४८ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (५) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे महानगर आयुक्त यांना खालील अधिकार प्रत्यायोजित करीत आहे –

(अ) **प्रशासकीय अधिकार** : विभाग प्रमुखांची पदे वगळून इतर संवर्गातील कर्मचा-यांच्या / अधिका-यांच्या नियुक्त्या करण्यासंबंधात –

(१) सुयोग्य व अपवादात्मक प्रकरणांमध्ये नियुक्तीसाठीचे निकष (मार्गदर्शक तत्वे / सेवाप्रवेश नियम) शिथिल करणे,

(२) व्यपगत वा आस्थगित असलेली पदे पुनरुज्जीवित करणे,

(३) एका संवर्गातील पदाचे दुस-या संवर्गातील समकक्ष पदात रुपांतरण करणे,

(४) अशा पदांवरील नियुक्तीसाठीच्या निकषांमध्ये (मार्गदर्शक तत्वे / सेवाप्रवेश नियम) सुधारणा करणे / फेरबदल करणे किंवा ते नव्याने तयार करणे,

(५) प्राधिकरणातील कर्मचारीवर्गाच्या संवर्गाच्या आस्थापना रचनेत फेरबदल करणे / त्यांची पुनर्रचना करणे,

(६) पदे भरण्यासाठी सरळ सेवाप्रवेश व पदोन्नती यांच्यातील गुणोत्तराचे प्रमाण ठरविणे / बदलणे, आणि

(७) प्रकल्पांसाठी विशिष्ट क्षेत्रातील तज्ञांच्या कंत्राटी पध्दतीवर नियुक्त्या करताना त्यांना द्यावयाचे एकत्रित वेतन व इतर सोयी सवलती, त्यांच्या कामाच्या टर्म्स ऑफ रेफरन्स् इ. ठरविण्याचे पूर्ण अधिकार

(ब) **आर्थिक अधिकार** :

(१) रु.१० कोटीपर्यंत खर्चाचे प्रकल्प व योजना यासाठी प्रशासकीय मंजूरी देऊन निविदा मागविणे व मंजूर करणे,

(२) प्रकल्पासाठी सल्लागाराची नेमणूक करण्याकरीता निविदा मागवून रु.५० लाखापर्यंत फी देऊन सल्लागाराची नेमणूक करणे,

(३) निविदा न मागविता एकमेव स्त्रोत या तत्वावर रु.१० लाख इतक्या फी पर्यंत सल्लागाराची नेमणूक करणे,

..११/-

(४) रु.१० लाखापर्यंत निविदा न मागविता पुरवठादाराची / कंत्राटदाराची एकमेव स्त्रोत या तत्वावर नेमणूक करणे,

(५) प्रत्येक प्रकरणी रु.५० लाखापर्यंत आवर्ती (Recurring) व अनावर्ती (Non-Recurring) खर्चास मान्यता देणे, आणि

(६) राष्ट्रीयकृत बँकांमध्ये १३ महिन्यांपर्यंत तसेच अनुसूचित बँका व वित्तीय संस्थांमध्ये १ वर्षापर्यंत प्राधिकरणाचा अतिरिक्त निधी गुंतविणे."

**<u>बाब क्र.८</u> : <u>जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत (JNNURM) निधी प्राप्तीसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रकल्प मूल्यन (Project appraisal) आणि प्रगती अहवाल तयार करणेसाठी सल्लागारांच्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.</u>**

८.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या प्राधान्य क्र.१ मध्ये समावेश असलेले सहार उन्नत मार्ग, पूर्व मुक्त मार्ग व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील उड्डाणपूल या ३ प्रकल्पांची केंद्र शासनाने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत निधी प्राप्तीसाठी निवड केली. या प्रकल्पांसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, मूल्यांकन अहवाल तयार करणे, केंद्र शासनाच्या मंजूरी समितीस स्पष्टीकरण तसेच सादरीकरण करणे इत्यादींसाठी सल्लागाराची आवश्यकता आहे. मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत या तीनही प्रकल्पांसाठी सखोल अभियांत्रिकी अभ्यास व प्रकल्प व्यवस्थापन यासाठी कार्यरत असलेल्या म्हणजे सहार उन्नत मार्गासाठी मे.स्टुप कन्सल्टंट्स, पूर्व मुक्त मार्गासाठी मे.कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील उड्डाणपूलांसाठी मे.एस.एन.भोबे अँड असोसिएटस् याच सल्लागारांची जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानास सादर करावयाचा अहवाल तयार करण्यासाठी तसेच प्रकल्पाच्या मंजूरीसाठी आवश्यक ती माहिती पुरविण्यासाठी नेमणूक करण्यात आली. मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत या ३ प्रकल्पांसाठी या सल्लागारांनी करावयाच्या कामाव्यतिरिक्त, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानासाठी करावयाच्या अतिरिक्त कामासाठी प्रमाणित शुल्क निश्चित करण्यात आले. आता मे.स्टुप कन्सल्टंट्स, मे.कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस आणि मे.एस.एन.भोबे अँड

असोसिएटस् या ३ सल्लागारांच्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी घेण्यासाठी कार्यकारी समितीस प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाच्या केंद्रीय मंजूरी समितीने सहार उन्नत मार्ग व पूर्व मुक्त मार्ग यासाठी अनुक्रमे रु.१५५.१३ कोटी व रु.३३६.३८ कोटी इतक्या प्रकल्प खर्चास मान्यता दिली असून या खर्चामध्ये केंद्र शासन, राज्य शासन व अंमलबजावणी संस्थांचा अनुक्रमे ३५%, १५% व ५० % असा हिस्सा आहे. केंद्र शासनाने आर्थिक मदतीचा पहिला हप्ता म्हणून सहार उन्नत मार्ग व पूर्व मुक्त मार्ग यासाठी अनुक्रमे रु.५.४२ कोटी व रु.५.८८ कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे.

८.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.१०४९ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत (JNNURM) निधी प्राप्तीसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, मूल्यांकन अहवाल तयार करणे, प्रगती अहवाल तयार करणे इत्यादीसाठी मे.स्टुप कन्सल्टंट (सहार उन्नत मार्गासाठी) मे.कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (पूर्व मुक्त मार्गासाठी) आणि मे.एस.एन.भोबे अँड असोसिएट्स (डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील उड्डाणपूलांसाठी) यांची खाली नमूद केलेल्या फी वर (सेवाकर वगळून) नेमणूक करण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे.

| सल्लागाराचे नांव | प्रकल्पाचे नांव | एकूण फी (सेवाकर वगळून) |
|---|---|---|
| मे.स्टुप कन्सल्टंट | सहार उन्नत मार्ग | रु.०९,६१,०००/- |
| मे.कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस | पूर्व मुक्तमार्ग | रु.१०,५४,०००/- |
| मे.एस.एन.भोबे अँड असोसिएट्स | डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील उड्डाणपूल | रु.०७,२९,०००/- |

"

**<u>बाब क्र.९</u> : <u>मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाची माहिती सर्व सामान्य नागरिक व प्रकल्पग्रस्तांपर्यंत प्रभावीरित्या पोहचविण्याकरीता जनसंपर्क सल्लागार संस्थेची नियुक्ती करणे.</u>**

९.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाची माहिती सर्व नागरिक, प्रकल्पग्रस्त आणि सर्व संबंधितांपर्यंत प्रभाविरीत्या पोहचविण्यासाठी कार्यकारी समितीच्या मान्यतेने मे.क्लिया पब्लिक रिलेशन प्रा.लि. या संस्थेची एप्रिल २००५ ते एप्रिल, २००६ या एक वर्षाच्या कालावधीकरिता नेमणूक करण्यात आली होती. त्यानंतर सदर संस्थेस मे २००६ ते जुलै, २००६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. या संस्थेची मुदत संपल्यानंतर पुढील कालावधीकरीता जनसंपर्क सल्लागाराची नियुक्ती करणे आवश्यक होते. म्हणून जागतिक बँकेच्या कम्युनिकेशन स्पेशालिस्टने शिफारस केलेल्यांपैकी मे.संपर्क पब्लिक रिलेशन प्रा.लि. या संस्थेची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या जनसंपर्क कामासाठी दरमहा रु.३० लाख इतक्या फी वर दोन महिन्यांकरिता एकमेव स्त्रोत या तत्वावर ऑगस्ट, २००६ मध्ये नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर सदर संस्थेस मे, २००७ पर्यंत मुदवाढ देण्यात आली. अशारीतीने ऑगस्ट, २००६ ते मे, २००७ या कालावधीसाठी या संस्थेला एकूण रु.३० लाख इतकी फी अदा करण्यात आली आहे. हा खर्च प्राधिकरणाच्या निधीतून करण्यात आलेला आहे. आता मे.संपर्क पब्लिक रिलेशन प्रा.लि. या संस्थेच्या नेमणूकीस तसेच त्यांना देण्यात आलेल्या रु.३० लाख इतक्या फी स कार्योत्तर मंजूरी देण्याची कार्यकारी समितीस विनंती करण्यात आली आहे.

९.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पासाठी जनसंपर्क सल्लागाराची आवश्यकता असल्यामुळे जागतिक बँकेच्या मान्यतेने, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, ६ जनसंपर्क सल्लागार संस्थांना प्रस्तावाचे विनंती अर्ज (Request for proposal) पाठविण्यात आले. त्यापैकी ३ जनसंपर्क सल्लागार संस्थांनी प्रस्तावाचे विनंती अर्ज सादर केले. या प्रस्तावांची छाननी केली असता विहित निकषानुसार मे.संपर्क पब्लिक रिलेशन प्रा.लि. व मे.क्लिया पब्लिक रिलेशन प्रा.लि. या दोन संस्था तांत्रिकदृष्टया पात्र ठरल्या. या दोन्ही संस्था प्रति वर्ष रु.३० लाख अधिक नियमानुसार सेवाकर या निश्चित रक्कमेवर काम करण्यास तयार आहेत. तथापि, तांत्रिक मूल्यमापनामध्ये मे.संपर्क पब्लिक रिलेशन प्रा. लि. यांना सर्वात

जास्त गुण मिळाले. मे.संपर्क पब्लिक रिलेशन प्रा. लि. या संस्थेची जनसंपर्क सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास जागतिक बँकेने मान्यता दिली आहे. त्यानुसार मे.संपर्क पब्लिक रिलेशन प्रा. लि. यांची रु.३० लाख अधिक नियमानुसार सेवाकर इतक्या फी वर एक वर्षाच्या कालावधीकरीता मुंबई नागरी परिवहन प्रकल्पासाठी जनसंपर्क सल्लागार म्हणून नेमणूक करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे. प्रथमतः हा खर्च प्राधिकरणाच्या निधीतून करण्यात येईल व त्यानंतर या खर्चाची प्रतिपूर्ती जागतिक बँकेकडून मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत व जागतिक बँकेसोबत केलेल्या करारनाम्यानुसार करण्यात येईल. तसेच सदर खर्च प्रकल्प खर्चाच्या प्रमाणात मुंबई रेल्वे विकास महामंडळाकडून वसूल करण्यात येईल.

९.३ चर्चेदरम्यान सदस्यांनी असे निदर्शनास आणले की, प्राधिकरणाच्या जनसंपर्क सल्लागाराचे काम समाधानकारक नाही. या अनुषंगाने जनसंपर्क सल्लागार संस्थेची नेमणूक एक वर्षाच्या कालावधीकरीता करण्याऐवजी फक्त सप्टेंबर २००७ पर्यंत करण्याच्या पर्यायाचा कार्यकारी समितीने विचार केला. तथापि, चर्चेनंतर कार्यकारी समितीने असे ठरविले की, जनसंपर्क सल्लागार संस्थेच्या नेमणूकीसाठी जागतिक बँक आग्रही असल्यामुळे मे.संपर्क पब्लिक रिलेशन प्रा.लि. या सल्लागार संस्थेची एक वर्षाच्या कालावधीकरीता नेमणूक करण्यात यावी, मात्र सदर जनसंपर्क सल्लागार संस्थेने करावयाच्या कामाचा कृती आराखडा (Action Plan) तयार करावा व त्यानुसार जनसंपर्क सल्लागार संस्थेच्या कामाचे संनियंत्रण करावे.

९.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.१०५० :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाची माहिती प्रभावीरीत्या नागरिक,

प्रकल्पग्रस्त व सर्व संबंधितांपर्यंत पोहचविण्याकरीता मे.संपर्क पब्लिक रिलेशन प्रा.लि. यांची रु.३०,००,०००/- (रुपये तीस लाख मात्र) अधिक सेवाकर इतक्या फी वर एका वर्षाच्या कालावधीकरीता जनसंपर्क सल्लागार संस्था म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देत आहे. सुरुवातीस हा खर्च प्राधिकरणाच्या निधीतून करण्यात यावा व नंतर या खर्चाची प्रतिपूर्ती जागतिक बँकेकडून मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत व जागतिक बँकेसोबत केलेल्या करारनाम्यानुसार करण्यात यावी. तसेच सदर खर्च प्रकल्प खर्चाच्या प्रमाणात मुंबई रेल्वे विकास महामंडळाकडून वसूल करण्यात यावा. त्याचप्रमाणे सदर जनसंपर्क सल्लागार संस्थेने करावयाच्या कामाचा कृती आराखडा (Action Plan) तयार करावा व त्यानुसार जनसंपर्क सल्लागार संस्थेच्या कामाचे संनियंत्रण करावे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या जनसंपर्क कामासाठी मे.संपर्क पब्लिक रिलेशन प्रा.लि. या जनसंपर्क सल्लागार संस्थेची ऑगस्ट, २००६ ते मे, २००७ या दहा महिन्याच्या कालावधीसाठी एकमेव स्त्रोत या तत्वावर प्रतिमहा रु.३ लाख इतक्या फी वर केलेल्या नेमणूकीस याद्वारे कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१० : मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी अंतर्गत भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेला एकात्मिक पाणी पुरवठा योजना - टप्पा-१ब वरालादेवी विकास व पुनरुत्थान (Rejuvenation) योजनेसाठी व जीआयएस यंत्रणा विकसित करण्यासाठी कर्ज सहाय्य देणे.**

१०.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेने विनंती केली आहे की, एकात्मिक पाणी पुरवठा योजना टप्पा-१ब अंतर्गत वरालादेवी तलावातून पाणी पुरवठा ३ एमएलडीपासून १२ एमएलडीपर्यंत

..१६/-

वाढविण्यासाठी रु.१६२५.८९ लाख खर्चाच्या योजनेस रु.११०० लाख इतके कर्ज प्राधिकरणाने उपलब्ध करुन द्यावे तसेच मालमत्ता कर आणि पाणीपट्टी वसूल करण्याबाबतची अद्ययावत माहिती यंत्रणा तयार करण्यासाठी जीआयएस पध्दती (Geographical Information System) विकसित करण्यासाठी रु.२५० लाख खर्चाच्या योजनेस प्राधिकरणाने रु.२२५ लाख इतके कर्ज उपलब्ध करुन द्यावे. या योजना भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेने तयार केल्या असून त्यासाठी प्राधिकरणाकडून कर्ज घेण्यास महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे. तसेच वरालादेवी तलावाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाने मंजूरी दिली आहे. या योजनांची अंमलबजावणी सदर महानगरपालिका स्वतः करणार असून या योजनांसाठी प्राधिकरणाकडून कर्ज घेण्यास सदर महानगरपालिकेने महाराष्ट्र शासनाकडे परवानगी मागितली आहे. या योजनांच्या एकूण खर्चापैकी १२% खर्च महानगरपालिका स्वतःच्या निधितून करणार असून १७% खर्च केंद्र शासनाच्या अनुदानातून व उर्वरीत ७१% खर्च कर्जाच्या स्वरुपात उभारावयाचा आहे. या योजना ३ वर्षाच्या कालावधीत पूर्ण होतील असे अपेक्षित आहे. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी अधिनियमानुसार प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या ९०% पर्यंत रक्कम कर्जाऊ देता येते मात्र कर्ज परतफेडीचा कालावधी १५ वर्षापेक्षा अधिक नसावा व कर्ज परतफेडीचा सूटीचा कालावधी ३ वर्षापेक्षा जास्त नसावा अशी बंधने आहेत. तसेच प्राधिकरणाच्या सध्याच्या धोरणानुसार भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेस द.सा.द.शे. ८% व्याज दराने कर्ज मंजूर करता येईल. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, सदर महानगरपालिकेकडे शिल्लकी महसूल अपेक्षित असल्यामुळे सदर महानगरपालिका प्राधिकरणाच्या कर्जाची परतफेड करण्यास सक्षम आहे. अशाप्रकारे मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी अंतर्गत रु.१३२५.०० लाख इतके कर्ज घेण्यासाठी सदर महानगरपालिका पात्र आहे. मात्र त्यासाठी महानगरपालिकेस शासनाची मंजूरी घ्यावी लागेल. त्यानुसार, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेस पाणी पुरवठा योजना टप्पा-१ब आणि जीआयएस यंत्रणेसाठी रु.१३२५.०० लाख इतके कर्ज द.सा.द.शे.८% व्याजदर आकारुन १५ वर्षाच्या कर्ज परतफेडीच्या कालावधीसाठी, बाब टिप्पणीत नमूद केलेल्या कर्जाच्या अटी व शर्तीनुसार, देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

१०.२ या प्रस्तावासंबंधात श्री.के.एन.खवारे, सह सचिव, नगर विकास विभाग यांनी असे नमूद केले की, नॅशनल अर्बन इन्फरमेशन सिस्टीममध्ये भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेची निवड झाली असल्यामुळे जीआयएस यंत्रणा विकसित करण्यासाठी या महानगरपालिकेस निधी उपलब्ध होईल. म्हणून जीआयएस यंत्रणा वगळून पाणी पुरवठा योजना टप्पा-१ब साठी प्राधिकरणाने कर्ज उपलब्ध करुन द्यावे. डॉ.जयराज फाटक, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनीही या सूचनेस पुष्टी दिली.

१०.३ वरील सूचनेस मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

<u>ठराव क्र.१०५१</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम २१-अ अन्वये प्राधिकरणाने ठराव क्र.४२२, दिनांक ३१ मार्च, १९९० द्वारे कार्यकारी समितीस प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेला पाणी पुरवठा योजना टप्पा-१ब साठी रु.११०० लाख इतकी कर्जाऊ रक्कम मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी अंतर्गत खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूर करीत आहे :-

(१) <u>व्याजाचा दर</u> : ८% द.सा.द.शे.

(२) <u>कर्ज परतफेडीचा कालावधी</u> : १५ वर्षे, कर्जाचा प्रत्येक हप्ता वितरीत केलेल्या दिनांकापासून.

(३) <u>हमी देणे</u> : महानगरपालिकेने कर्ज व त्यावरील व्याज परतफेड करण्यासाठी हमी म्हणून एस्क्रो खाते उघडणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी अंतर्गत याआधी मंजूर केलेल्या कर्जासाठी बीएनसीएमसी, आयआरडीपी टप्पा-१ एस्क्रो खाते इंडियन बँक, भिवंडी शाखा येथे उघडले आहे व या कर्जाच्या परतफेडीसाठी महानगरपालिकेचे सर्व स्त्रोतातून मिळणारे उत्पन्न या एस्क्रो खात्यात जमा करण्यात येत असून कर्ज परतफेडीचा एक हप्ता कर्जाची हमी म्हणून ठेऊन उर्वरीत रक्कम त्याच बँकेच्या इतर खात्यात वळती करण्यात येते. या पध्दतीने महानगरपालिकेने हेच एस्क्रो खाते कायम ठेऊन या खात्यात नवीन कर्जाच्या एका हप्त्याची रक्कम प्राधिकरणाच्या प्रस्तावित कर्ज परतफेडीची हमी म्हणून ठेवावी.

..१८/-

(४) **कर्ज वितरण व्यवस्था :**

(अ) कर्ज करारपत्रावर सहया झाल्यानंतर एकूण मंजूर कर्जाच्या १०% रक्कम वितरीत करण्यात येईल व उर्वरीत ९०% रक्कम उपयोगिता प्रमाणपत्र व विहित नमुन्यातील प्रकल्पावरील त्रैमासिक खर्चाचे प्रमाणित विवरणपत्र सादर केल्यानंतर प्रतिपूर्तीच्या आधारे वेळोवेळी वितरीत करण्यात येईल.

(ब) कर्ज करारपत्र करण्यापूर्वी प्रकल्पावर केलेला खर्च प्रतिपूर्तीसाठी ग्राहय धरला जाईल.

(क) महानगरपालिकेला वितरित करण्यात येणारी प्रत्येक कर्ज हप्त्याची रक्कम एस्क्रो खात्यात प्रथम जमा केली जाईल.

(५) **कर्जबंद होण्याचा दिनांक :** कर्ज करारपत्र झाल्यापासून ३६ महिने किंवा पूर्ण कर्जाची रक्कम वितरीत होणे यापैकी जे अगोदर होईल.

तसेच कार्यकारी समितीने कर्ज मंजूर केल्यावर प्राधिकरण व महानगरपालिका यांच्यामध्ये ९ महिन्याच्या आत कर्ज करारपत्र होणे आवश्यक आहे.

(६) **व्याजासह कर्जाची परतफेड :** प्रतिवर्षी ३० जून व ३१ डिसेंबर रोजी अर्धवार्षिक समान हप्त्यात.

(७) **कर्जाच्या काही अतिरिक्त अटी आणि शर्ती :**

(अ) महानगरपालिकेने मुंबई प्रांतीक महानगरपालिका कायदा, १९४९ च्या कलम १०९ नुसार पाणी पुरवठा योजना टप्पा-१ब रु.११०० लाख इतके कर्ज प्राधिकरणाकडून घेण्यासाठी कर्ज करारपत्र करण्यापूर्वी शासनाची मंजूरी मिळवावी.

(ब) महानगरपालिकेस याआधी पाणी पुरवठा योजनेसाठी (टप्पा-१अ) मंजूर केलेल्या कर्जाच्या दिनांक ६ जून, २००७ रोजी केलेल्या करारामध्ये नमूद केलेल्या अटीनुसार नागरी सुधारणांची अंमलबजावणी करेल.

(क) महानगरपालिकेने कर्जाची रक्कम परतफेड करण्यासाठी एस्क्रो खात्यात प्रस्तावित करण्यात आलेली रक्कम भरणे तसेच प्रकल्पाच्या दुरुस्ती व देखभालीसाठी (O&M) आवश्यक असलेली वार्षिक खर्चाची तरतूद अंदाजपत्रकात करणे आवश्यक असेल.

(ड) प्राधिकरणाच्या लेखी परवानगीशिवाय महानगरपालिकेने कुठल्याही प्रकारचे नवीन कर्ज इतर कोणत्याही संस्थांकडून उभारु नये.

..१९/-

(इ) प्राधिकरण मुंबई प्रांतीक महानगरपालिका कायदा, १९४९ मधील तरतूदींच्या अधीन राहून महानगरपालिकेच्या महसूली जमा रक्कमेवर प्रथम हक्क बजावील.

(फ) कर्ज करार करण्यापूर्वी महानगरपालिकेने पाणी पुरवठा वितरण व्यवस्था टप्पा-१ब साठी केलेला खर्च कर्ज वितरणासाठी ग्राहय धरला जाईल.

(ग) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ४४ अन्वये एरियर्स ऑफ लँड रेव्हेन्यूच्या स्वरुपात प्राधिकरण महानगरपालिकेकडून थकीत रक्कम वसूल करु शकेल.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करणे तसेच कर्जाची रक्कम, व्याजदर आणि कर्ज परतफेडीचा कालावधी या अटींव्यतिरिक्त प्रकल्प अंमलबजावणी कालावधी, आगाऊ कर्जसहाय्य देणे तसेच कर्जाच्या इतर अटी व शर्तींमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.११ : मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी अंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिकेला विकास आराखडयातील रस्ते सुधारणा व भुयारी गटार योजनेची कामे करण्यासाठी कर्ज सहाय्य देणे.**

**११.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, विकास आराखडयातील रस्त्यांची सुधारणा (खर्च - रु.३०६६ लाख) आणि भूयारी गटार योजना (खर्च - रु.२९६१ लाख) अशा एकूण सुमारे रु.६०२७ लाख खर्चाच्या प्रकल्पांसाठी प्राधिकरणाने कर्ज उपलब्ध करुन द्यावे अशी मिरा-भाईंदर महानगरपालिकेने विनंती केलेली आहे. या प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यासाठी व त्यासाठी प्राधिकरणाकडून कर्ज घेण्यास महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे. भूयारी गटारांचा रु.३९४.६७ कोटी खर्चाचा प्रकल्प अहवाल मिरा-भाईंदर महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत अर्थसहाय्य प्राप्त करण्यासाठी महाराष्ट्र शासनामार्फत केंद्र शासनाकडे सादर केला आहे. केंद्र शासनाची मान्यता अद्याप प्रलंबित आहे. भूयारी गटार योजनेतील काही विभागांची कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी सदर महानगरपालिकेने रु.२९.६१ कोटी खर्चाच्या

..२०/-

कामांसाठी प्राधिकरणाकडे कर्जाची मागणी केली आहे. या दोन प्रकल्पांच्या एकूण रु.६०२७.५९ लाख इतक्या खर्चापैकी १७% खर्च महानगरपालिका स्वतःच्या निधीतून करणार असून उर्वरीत ८३% म्हणजे रु.५००० लाख इतकी रक्कम प्राधिकरणाने कर्जाच्या स्वरुपात द्यावी अशी महानगरपालिकेने विनंती केलेली आहे. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी अधिनियमानुसार प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या ९०% पर्यंत रक्कम कर्जाऊ देता येते मात्र कर्ज परतफेडीचा कालावधी १५ वर्षापेक्षा अधिक नसावा व कर्ज परतफेडीचा सूटीचा कालावधी ३ वर्षापेक्षा जास्त नसावा अशी बंधने आहेत. प्राधिकरणाच्या सध्याच्या धोरणानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेस द.सा.द.शे. ८% व्याज दराने कर्ज मंजूर करता येईल. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे महानगरपालिकेकडे शिल्लकी महसूल अपेक्षित असल्यामळे सदर महानगरपालिका प्राधिकरणाच्या कर्जाची परतफेड करण्यास सक्षम आहे. अशाप्रकारे मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी अंतर्गत रु.५००० लाख इतके कर्ज घेण्यास सदर महानगरपालिका पात्र आहे. यासाठी महानगरपालिकेने शासनाची मान्यता प्राप्त केली आहे. त्यानुसार, मिरा-भाईंदर महानगरपालिकेस विकास आराखडयातील रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी (रु.२३३५.०१ लाख) व भूयारी गटार योजनेसाठी (रु.२६६४.९९ लाख) अशाप्रकारे एकूण रु.५००० लाख इतके कर्ज द.सा.द.शे. ८% व्याज दर आकारुन १५ वर्षाच्या कर्ज परतफेडीच्या कालावधीसाठी, बाब टिप्पणीत नमूद केलेल्या कर्जाच्या अटी व शर्तीनुसार, देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

**११.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१०५२ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम २१-अ अन्वये प्राधिकरणाने ठराव क्र.४२२, दिनांक ३१ मार्च, १९९० द्वारे कार्यकारी समितीस प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मिरा-भाईंदर महानगरपालिकेस विकास आराखडयातील रस्त्यांची सुधारणा व भूयारी गटार

योजनेच्या अंमलबजावणीसाठी रु.५०००.०० लाख इतकी कर्जाऊ रक्कम मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी अंतर्गत खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूर करीत आहे :-

(१) <u>व्याजाचा दर</u> : ८% द.सा.द.शे.

(२) <u>कर्ज परतफेडीचा कालावधी</u> : १५ वर्षे, कर्जाचा प्रत्येक हप्ता वितरीत केलेल्या दिनांकापासून.

(३) <u>हमी देणे</u> : मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कर्जाच्या परतफेडीची हमी म्हणून एस्क्रो खाते उघडणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने कर्ज करारपत्र करण्यापूर्वी "एमबीएमसी सिवरेज व रस्ते एस्क्रो खाते" या नावाने एस्क्रो खाते राष्ट्रीयकृत बँकेत उघडून आपल्या खात्यातून दरमहा किमान रु.५० लाख इतकी रक्कम एस्क्रो खात्यामध्ये जमा करावी. अशी रक्कम संपूर्ण कर्ज वितरण होईपर्यंत कर्ज परतफेडीच्या तीन सहामाही हप्त्यांइतकी एकूण रु.८६७.४५ लाख जमा होईपर्यंत जमा करावी. अशा रकमेतून कर्ज परतफेडीच्या वेळापत्रकानुसार कर्जाचा एक हप्ता रु.२८९.१५ लाख दिल्यानंतर उर्वरीत दोन हप्ते कायमस्वरुपी एस्क्रो खात्यात प्रतिभूती (security) म्हणून जमा राहतील. कर्जाच्या हप्त्यासाठी खात्यातून वापरलेली रक्कम या खात्यात महानगरपालिकेने पुढच्या कर्ज परतफेडीच्या हप्त्याअगोदर एस्क्रो खात्यात सहा महिन्याच्या आत जमा करावी.

(४) <u>कर्ज वितरण व्यवस्था</u> :

(अ) कर्ज करारपत्रावर सहया झाल्यानंतर एकूण मंजूर कर्जाच्या १०% रक्कम वितरीत करण्यात येईल व उर्वरीत ९०% रक्कम उपयोगिता प्रमाणपत्र व विहित नमुन्यातील प्रकल्पावरील खर्चाचे प्रमाणित विवरणपत्र सादर केल्यानंतर प्रतिपूर्तीच्या आधारे वेळोवेळी वितरीत करण्यात येईल.

(ब) कर्ज करारपत्र करण्यापूर्वी प्रकल्पावर केलेला खर्च प्रतिपूर्तीसाठी ग्राहय धरला जाईल.

(क) महानगरपालिकेला वितरीत करण्यात येणारी प्रत्येक कर्ज हप्त्याची रक्कम एस्क्रो खात्यात प्रथम जमा केली जाईल.

(५) <u>कर्जबंद होण्याचा दिनांक</u> : कर्ज करारपत्र झाल्यापासून ३६ महिने किंवा पूर्ण कर्जाची रक्कम वितरीत होणे यापैकी जे अगोदर होईल, तसेच प्रकल्पावरील रक्कम ३६ महिन्यात पूर्ण न झाल्यास कर्ज परतफेडीचे हप्ते वितरीत केलेल्या कर्जानुसार ठरविता येतील.

तसेच कार्यकारी समितीने कर्ज मंजूर केल्यावर प्राधिकरण व महानगरपालिका यांच्यामध्ये ९ महिन्याच्या आत कर्ज करारपत्र होणे आवश्यक आहे.

(६) <u>व्याजासह कर्जाची परतफेड</u> : प्रतिवर्षी ३० जून व ३१ डिसेंबर रोजी अर्धवार्षिक समान हप्त्यात.

(७) <u>कर्ज सहाय्याच्या इतर अटी व शर्ती</u> :

(अ) महानगरपालिकेने कर्जाची रक्कम परतफेड करण्यासाठी व परतफेडीच्या हमीसाठी एस्क्रो खात्यात प्रस्तावित करण्यात आलेली रक्कम भरणे तसेच प्रकल्पाच्या दुरुस्ती व देखभालीसाठी (O&M) आवश्यक असलेली वार्षिक खर्चाची तरतूद अंदाजपत्रकात करणे आवश्यक असेल.

(ब) प्राधिकरणाच्या लेखी परवानगीशिवाय महानगरपालिकेने कुठल्याही प्रकारचे नवीन कर्ज इतर कोणत्याही संस्थांकडून उभारु नये.

(क) प्राधिकरण मुंबई प्रांतीक महानगरपालिका कायदा, १९४९ मधील तरतूदींच्या अधीन राहून महानगरपालिकेच्या महसूली जमा रक्कमेवर प्रथम हक्क बजावील.

(ड) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ४४ अन्वये एरियर्स ऑफ लँड रेव्हेन्यूच्या स्वरुपात प्राधिकरण महानगरपालिकेकडून थकीत रक्कम वसूल करु शकेल.

(इ) कर्ज करार करण्यापूर्वी महानगरपालिकेने विकास आराखडयातील रस्ते सुधारणा व भूयारी गटार योजनेच्या अंमलबजावणीसाठी केलेला खर्च कर्ज वितरणासाठी ग्राहय धरला जाईल.

(फ) भूयारी गटार योजना जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान अंतर्गत मंजूर होऊन प्राधिकरणाने कर्जसहाय्य मंजूर केलेल्या कामांसाठी अनुदान प्राप्त झाल्यास महानगरपालिका प्राधिकरणाचे कर्ज पूर्णपणे वापरण्यासाठी भूयारी गटार योजनेची इतर कामे प्रस्तावित करेल.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करणे तसेच कर्जाची रक्कम, व्याजदर आणि कर्ज परतफेडीचा कालावधी या अटींव्यतिरिक्त प्रकल्प अंमलबजावणी कालावधी, आगाऊ कर्ज सहाय्य देणे, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान अंतर्गत भूयारी गटार योजना मंजूर झाल्यास प्राधिकरणाने कर्ज सहाय्य मंजूर केलेल्या प्रकल्पाच्या घटकामध्ये बदल करणे तसेच कर्जाच्या इतर अटी व शर्तींमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१२ : मिठी नदी व वाकोला नाल्याच्या टप्पा-२ मधील रुंदीकरणात येणा-या तिवरांची झाडे काढणे व पुनर्रोपण/नवीन लागवड अन्यत्र ठिकाणी करण्यासाठी शास्त्रोक्त अभ्यास करण्याकरीता सल्लागाराच्या नेमणूकीला कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

१२.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, जुलै, २००५ च्या पूर परिस्थितीनंतर शासनाने नियुक्त केलेल्या सत्यशोधन समितीच्या (चितळे समिती) शिफारशींनुसार १०० वर्षातून एकदा होऊ शकणारी जास्तीत जास्त पर्जन्यवृष्टी विचारात घेऊन मिठी नदी व वाकोला नाल्याच्या पात्रांची खोली व रुंदी वाढविणे आवश्यक आहे. यासंबंधात प्राधिकरणाने केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र, पुणे या संस्थेमार्फत अभ्यास पूर्ण केला असून त्यांच्या जानेवारी, २००६ च्या अहवालाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. या अहवालाच्या शिफारशींची पूर्ण अंमलबजावणी करण्यासाठी मिठी नदी व वाकोला नाल्याच्या टप्पा-२ मधील रुंदीकरणात येणा-या तिवर वृक्षांचे अन्यत्र पुनर्रोपण/नवीन लागवड करण्यासंबंधातील सर्व कार्यवाही मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या मान्यतेनुसार करावयाची आहे. त्यासाठी वांद्रे-कुर्ला संकुलातील तिवर वृक्षांच्या पुनर्रोपणाचा / नवीन लागवडीचा प्रस्ताव शास्त्रोक्तपणे तयार करण्यासाठी टर्म्स ऑफ रेफरन्स तयार करुन ३ सल्लागार संस्थांकडून निविदा मागविण्यात आल्या. त्यापैकी मे.क्रिएटीव्ह बिझिनेस असोसिएटस् यांची रु.४,६८,०००/- (सेवाकर वगळून) इतक्या फी ची लघुत्तम निविदा स्विकारण्यात आली असून अभ्यास कार्यासाठी त्यांची दिनांक २७ जून, २००७ रोजी नेमणूक करण्यात आली आहे. सदरील अभ्यास एकूण ३ महिन्यात पूर्ण करावयाचा असून या सल्लागारांच्या न्यायालयीन कामाकरीता मदतीचा व तिवर वृक्षांच्या देखभालीचा कालावधी ३ वर्षापर्यंत आहे. तिवरांच्या पुनर्रोपणास / नवीन लागवडीस परवानगी घेण्यासाठी या सल्लागारांच्या मदतीने दिनांक ४ ऑगस्ट, २००७ रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे प्रतिज्ञापत्रही सादर करण्यात आले आहे. तसेच मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत हाती घेतलेल्या रस्त्यांच्या रुंदीकरणाच्या कामांमध्ये येणा-या वृक्षांचे पुनर्रोपण या सल्लागारांमार्फत ब-याच प्रमाणात पूर्ण करण्यात आले आहे. या सल्लागारांच्या नेमणूकीची ही बाब आता कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे. या सल्लागारांच्या फी वरील खर्च मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत करावयाचा आहे.

..२४/-

१२.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**<u>ठराव क्र.१०५३</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदी व वाकोला नाल्याच्या टप्पा-२ मधील रुंदीकरणात येणा-या तिवरांच्या झाडांचे पुनर्रोपण / नवीन लागवड अन्यत्र ठिकाणी करण्यासाठी शास्त्रोक्त अभ्यास करण्याकरीता मे.किएटिव्ह बिझनेस असोशिएट्स या सल्लागारांची रु.४,६८,०००/- (सेवाकर वगळून) इतक्या फी वर नेमणूक करण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे. "

**<u>बाब क्र.१३</u> : <u>वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या पात्राची रुंदी व खोली वाढविणे, तसेच मिठी नदीच्या परिसराचा विकास करणे (संरक्षक भिंत बांधणे, पटल भिंती बांधणे इ.) यासाठीच्या टप्पा-२ मधील वाढीव कामांसाठी सध्या नियुक्त केलेल्या मे.टीसीई कन्सल्टींग इंजिनिअर्स लिमिटेड या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेस आधीच्या टप्पा-१ व टप्पा-२ च्या मंजूर कामांतर्गत अंतर्भूत करुन व त्यासाठी वाढीव फी चा सुधारीत प्रस्ताव मंजूर करणे.</u>**

१३.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या पात्राची रुंदी व खोली वाढविणे तसेच मिठी नदीच्या परिसराचा विकास करणे यासाठीच्या टप्पा-१ व टप्पा-२ मधील कामांवर देखरेख करणे, कामांची मोजमापे घेण्याची पध्दती निश्चित करणे, झालेल्या कामांची मोजमापे घेऊन त्यानुसार कंत्राटदारांची देयके अदा करण्याची शिफारस करणे इत्यादी कामांकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे.टीसीई कन्सल्टींग इंजिनिअर्स लिमिटेड (तत्कालीन मे.टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स) या सल्लागार संस्थेची एकमेव स्त्रोत या तत्वावर तसेच रु.१,९७,३२,०००/- इतक्या फी वर नेमणूक करण्यास

कार्यकारी समितीने दिनांक १७ मे, २००६ रोजी झालेल्या २१६ व्या बैठकीत मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर सल्लागार संस्था काम करीत आहे. तथापि, टप्पा-१ व टप्पा-२ मधील कामांचा पूर्वीचा अंदाजित खर्च रु.१३३ कोटी यामध्ये वाढ होऊन सुधारीत अंदाजपत्रकानुसार टप्पा-२ चा अंदाजित खर्च सुमारे रु.४३८ कोटी इतका झालेला आहे. म्हणून मे.टीसीई कन्सल्टींग इंजिनिअर्स लिमिटेड यांनी प्रकल्प व्यवस्थापनासाठी वाढीव फी देण्याची विनंती केली आहे. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, वाढीव फी च्या या मागणीची प्रमुख कारणे म्हणजे टप्पा-१ व टप्पा-२ मधील पूर्वीची रु.१३३ कोटी खर्चाची कामे केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र यांच्या सन १९७८ च्या अहवालानुसार होती. या संस्थेच्या जानेवारी, २००६ च्या अहवालानुसार टप्पा-२ मधील कामांमध्ये सुधारणा करण्यात आली असून त्यामध्ये मिठी नदी व वाकोला नाल्यासाठी अधिक तीव्र उतार प्रस्तावीत केला आहे, आर.सी.सी.संरक्षक भिंतीच्याऐवजी काही ठिकाणी पटल भिंतीचा (Diaphragm walls) अंतर्भाव केलेला आहे तसेच माहिम कॉजवे खालील भागात वाढीव खोली व रुंदीच्या चॅनेलचा अंतर्भाव करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे टप्पा-२ मधील कामांसाठी आता ३ ऐवजी १२ निविदा काढण्याची आवश्यकता आहे. तसेच निविदा मसुदा पत्रे तयार करणे, त्यांची सुधारीत अंदाजपत्रके तयार करणे आणि त्यानंतर प्राप्त होणा-या निविदांचे मूल्यमापन करणे ही अतिरिक्त कामे मे.टीसीई कन्सल्टींग इंजिनिअर्स यांना करावी लागणार आहेत. म्हणून अशाप्रकारे कामाचा वाढलेला व्याप व कालावधी यामुळे रु.३६३.२२ लाख अधिक सेवाकर इतक्या वाढीव फी ची मागणी मे.टीसीई कन्सल्टींग इंजिनिअर्स लि. यांनी केलेली आहे. विधमान दरानुसार सेवाकराची रक्कम रु.४४.९० लाख इतकी होते. अशाप्रकारे सेवाकरासहित रु.४०८.१२ लाख इतक्या वाढीव फी ची मागणी मे.टीसीई कन्सल्टींग इंजिनिअर्स लि. यांनी केलेली आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांना प्रकल्प खर्चाच्या २% ते ३% इतकी फी देण्यात येते. या तुलनेत मिठी नदीच्या टप्पा-२ च्या कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांना द्यावयाची फी ही प्रकल्प खर्चाच्या १.३८% इतकी असून ही फी उचित वाटते. म्हणून ही अतिरिक्त फी अदा करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. तसेच या व्यतिरिक्त मिठी नदीवरील माहिम कॉजवे ते सी.एस.टी. पूल व वाकोला नाल्यावरील वाकोला पूल ते सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्यापर्यंत येणा-या पूलांच्या

रुंदीकरणाचा अभ्यास, डिझाईन व अंदाजपत्रके तयार करण्यासाठी मे.टीसीई कन्सल्टींग इंजिनिअर्स लि. यांना टर्म्स ऑफ रेफरन्स तयार करुन आवश्यक ती अतिरिक्त फी अदा करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात यावे अशीही कार्यकारी समितीस विनंती करण्यात आली आहे.

**१३.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.१०५४ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या पात्राची रुंदी व खोली वाढविणे तसेच मिठी नदीच्या परिसराचा विकास करणे यासाठीच्या टप्पा-२ मधील कामांवर देखरेख करणे, कामांची मोजमापे घेण्याची पध्दती निश्चित करणे, झालेल्या कामांची मोजमापे घेऊन त्यानुसार कंत्राटदारांची देयके अदा करण्यासाठी शिफारस करणे इत्यादीच्या वाढीव कामाकरीता सध्याचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.टीसीई कन्सल्टींग इंजिनिअर्स लिमिटेड या संस्थेस रु.३६३.२२ लाख अधिक सेवाकर इतकी अतिरिक्त फी अदा करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** उपरोक्त नमूद केलेल्या वाढीव कामांच्या व्यतिरिक्त मिठी नदीवरील माहिम कॉजवे ते सी.एस.टी. पूल व वाकोला नाल्यावरील वाकोला पूल ते सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्यापर्यंत येणा-या पूलांच्या रुंदीकरणाचा अभ्यास, डिझाइन व अंदाजपत्रके तयार करण्यासाठी मे.टीसीई कन्सल्टींग इंजिनिअर्स लिमिटेड या प्रकल्प व्यवस्थापन संस्थेस टर्म्स ऑफ रेफरन्स तयार करुन आवश्यक ती वाढीव फी अदा करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

..२७/-

**बाब क्र.१४ : पावसाळयापूर्वी वाकोला नाल्यातील गाळ उपसण्याचे काम वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "एच" ब्लॉकमधील गाळ उपसण्याच्या कामाच्या मंजूर निविदे अंतर्गत अतिरिक्त काम म्हणून अंतर्भूत करुन पूर्ण करुन घेऊन त्यास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

१४.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कार्यकारी समितीच्या दिनांक १६ मार्च, २००७ रोजी झालेल्या २१९ व्या बैठकीत मिठी नदी टप्पा-२ च्या कामांच्या एकूण ६ कामांपैकी अ.क्र.१, ३ व ४ येथील कामांच्या निविदा कार्यकारी समितीने मंजूर केल्या व उर्वरीत अ.क्र.२, ५ व ६ येथील कामांच्या निविदा अवाजवी असल्यामुळे त्या नाकारुन फेरनिविदा मागविण्याचे ठरविले. त्यानुसार, टप्पा-२ च्या उर्वरीत कामांसाठी ऑगस्ट, २००७ मध्ये फेरनिविदा मागविण्यात आल्या आहेत. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे सन २००७ च्या पावसाळयापूर्वी वाकोला नाल्यातील गाळ उपसण्याचे काम प्राथम्याने हाती घेऊन पूर्ण करणे आवश्यक होते जेणेकरुन या नाल्याच्या सभोवतालचा परिसर पाण्याखाली येऊन जिवीत अथवा वित्त हानी होणार नाही. तसेच या भागातील नगरसेवक व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रभाग समितीचे अध्यक्ष यांनी वाकोला नाल्यातील गाळ उपसण्याचे काम सन २००७ च्या पावसाळयापूर्वी प्राथम्याने पूर्ण करण्याची प्राधिकरणास विनंती केली होती. वाकोला नाल्यातील गाळ उपसण्याचे काम हे टप्पा-२ मधील अ.क्र.२ च्या कामामध्ये समाविष्ट असल्यामुळे व या कामाच्या निविदा अवाजवी असल्यामुळे त्या नाकारुन फेरनिविदा मागविण्याचे ठरविण्यात आल्यामुळे वाकोला नाल्यातील गाळ उपसण्यासाठी, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, अन्य २ पर्यायांचा विचार करण्यात आला. पहिल्या पर्यायानुसार जाहिररीत्या निविदा मागवून व निविदेस कार्यकारी समितीची मंजूरी घेऊन काम पूर्ण करण्यास बराच कालावधी लागला असता. दुस-या पर्यायानुसार टप्पा-२ च्या कामासाठी कार्यकारी समितीने मान्यता दिलेल्या व अशाच प्रकारे काम करणा-या कंत्राटदाराकडून वाकोला नाल्यातील गाळ उपसण्याचे काम करुन घेण्याचा पर्याय पडताळून पहाण्यात आला. तथापि, अशा कंत्राटदाराकडून पावसाळयापूर्वी वाकोला नाल्यातील गाळ उपसण्याचे काम पूर्ण करण्याची शक्यता दिसून आली नाही. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "एच" ब्लॉकमधील गाळ उपसण्याच्या कामासाठी मे.एन ए कंस्ट्रक्शन यांची अंदाजित खर्चापेक्षा १८% जास्त दराची लघुत्तम निविदा स्विकारण्यात

येऊन त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वाकोला नाल्यातील गाळ उपसण्याचे काम हे "एच" ब्लॉकमधील गाळ काढण्याच्या कामांसारखेच असल्यामुळे संबंधीत कंत्राटदार मे.एन ए कंस्ट्रक्शन यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी वाकोला नाल्यातील गाळ उपसण्याचे काम "एच" ब्लॉकमधील गाळ उपसण्याच्या कामाच्या दरानेच पूर्ण करण्याची तयारी दर्शविली. त्यानुसार, वाकोला नाल्यातील गाळ उपसण्याच्या कामासाठी मे.एन ए कंस्ट्रक्शन यांची नेमणूक करण्यात आली. त्यानुसार, मे.एन ए कंस्ट्रक्शन या कंत्राटदाराने वाकोला नाल्यातील सुमारे ३९७०० घनमीटर एवढा गाळ उपसण्याचे काम या पावसाळयापूर्वी यशस्वीरित्या पूर्ण केले असून त्यामुळे वाकोला नाला व सभोवतालच्या परिसरात पूराचा धोका निर्माण झाला नाही तसेच कुठलीही जिवीत किंवा वित्त हानी झालेली नाही. त्यानुसार, वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "एच" ब्लॉकमधील गाळ उपसण्याच्या कामाच्या रु.३९९ लाख इतक्या अंदाजित खर्चाच्या कामामध्ये वाकोला नाल्यातील गाळ काढण्यासाठी रु.१८६ लाख इतक्या खर्चाचा अंतर्भाव करण्यास तसेच या दोन्ही कामांच्या रु.५८५ लाख इतक्या अंदाजित खर्चास कार्योत्तर मान्यता देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

**१४.२** श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली असता श्री.डी.डी.भिडे, मुख्य अभियंता, मिठी नदी कामे यांनी असे स्पष्ट केले की, वाकोला नाल्यातील उपसलेल्या गाळाचे ३९७०० घनमीटर हे आकारमान महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाने गाळ काढण्यापूर्वी व गाळ काढल्यानंतर घेतलेल्या लेव्हल्सनुसार आहे.

**१४.३** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन पुढील ठराव मंजूर केला :—

**<u>ठराव क्र.१०५५</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "एच" ब्लॉकमधील गाळ काढण्याच्या कामामध्ये वाकोला नाल्यातील गाळ काढण्याच्या कामाचा अंतर्भाव करण्यास तसेच या दोन्ही कामांच्या

रु.५८५.० लाख इतक्या एकत्रित अंदाजित खर्चास ("एच" ब्लॉकमधील गाळ काढण्याच्या कामासाठी रु.३९९.० लाख आणि वाकोला नाल्यातील गाळ काढण्यासाठी रु.१८६.० लाख) कार्योत्तर मान्यता देत आहे."

**बाब क्र.१५ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्प - जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता भाग १ व ३ कंत्राटामधील भाग-३ मधील टागोरनगर चौकात पादचारी वरपूलाच्या कंत्राटास मान्यता देण्याबाबत.**

**१५.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याचे काम हाती घेण्यात आले असून या जोडरस्त्याच्या भाग-१ व ३ चे काम मे.एन.सी.सी.-मेटास-महावीर (जेव्ही) या कंत्राटदारास दिलेले आहे. या जोडरस्त्याच्या भाग-१ मधील सारीपुतनगर येथील स्थानिक लोकांना नवीन तयार झालेला सहा पदरी जोडरस्ता ओलांडण्यास गैरसोय होते व त्यामुळे अपघात उद्‌भवतात ही बाब विचारात घेऊन सारीपुतनगर येथे ४५.७ मीटर लांबीचा व २.७ मीटर रुंदीचा नवीन पादचारी वरपूल बांधण्याचे ठरविण्यात आले. सदर पादचारी वरपूलाचा अंदाजित खर्च रु.४४ लाख इतका आहे. सदर अंदाजित खर्चानुसार सारीपुतनगर येथे पादचारी वरपूलाचे बांधकाम एकमेव स्त्रोत या तत्वावर कंत्राटदाराची नेमणूक करुन हाती घेण्यास जागतिक बँकेने मान्यता दिली. तथापि, जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याच्या भाग-१ व ३ चे कंत्राटदार मे.एन.सी.सी.-मेटास-महावीर (जेव्ही) यांनी जागतिक बँकेने मंजूर केलेल्या किंमतीस सदर पादचारी वरपूलाचे बांधकाम करण्यास असहमती दर्शवून चालू बाजारभावाप्रमाणे सदरील कामाचा खर्च ठरविण्यात यावा असे सूचविले. चालू बाजारभावानुसार सदर वरपूलाचा अंदाजित खर्च रु.५६,५३,३८०/- इतका आहे. त्यानुसार, मे.एन.सी.सी.-मेटास-महावीर (जेव्ही) या कंत्राटदाराकडून सदर वरपूलाचे काम करुन घेण्यास जागतिक बँकेने मान्यता दिली. तथापि, सारीपुतनगर येथे नवीन पादचारी वरपूलाचे स्थान पुरातत्त्व विभागाच्या हद्दीत येत असून या विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र अद्याप मिळालेले नाही. त्यामुळे सारीपुतनगर ऐवजी जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याच्या भाग-३ मधील टागोरनगर चौकात पादचारी वरपूल बांधण्याचे ठरविण्यात आले. टागोरनगर येथील नवीन रस्त्याची रुंदी ४५.७ मीटर इतकी असून रस्ता ओलांडणे धोकादायक आहे. या चौकात

..३०/-

पादचारी वरपूल बांधल्यास येथील स्थानिक लोकांना सुरक्षिततेच्या दृष्टीने उपयोगी होईल तसेच अपघात टाळणे शक्य होईल. तसेच सारीपुतनगर व टागोरनगर चौक येथे रस्त्याची रुंदी सारखीच असल्याने दोन्ही ठिकाणावरील पादचारी वरपूलाचे आराखडे तसेच स्ट्रक्चरल डिझाईन सारखेच आहेत. त्यानुसार जागतिक बँकेची मान्यता मिळेल या अपेक्षेने जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याच्या भाग-३ मधील टागोरनगर चौकात पादचारी वरपूलाचे बांधकाम करण्यासाठी रु.५६,५३,३८०/- इतक्या रक्कमेचे कंत्राट एकमेव स्त्रोत या तत्वावर मे.एन.सी.सी.-मेटास-महावीर (जेव्ही) यांना देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, पुरातत्त्व विभागाने ना-हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर सारीपुतनगर येथील पादचारी वरपूलाचे काम मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत करण्यात येईल.

**१५.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.१०५६ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता भाग-३ मधील टागोरनगर चौकात रु.५६,५३,३८०/- (रुपये छपन्न लाख त्रेपन्न हजार तीनशे ऐंशी मात्र) एवढया रकमेचे पादचारी वरपूल बांधण्याचे कंत्राट मे.एन.सी.सी.-मेटास-महावीर (जेव्ही) यांना एकमेव स्त्रोत या तत्वावर देण्यास, जागेच्या बदलास जागतिक बँकेची मान्यता मिळण्याच्या अधीन राहून, मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

..३१/-

**बाब क्र.१६ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व व पश्चिम द्रुतगती महामार्गावर मास्टीक ॲस्फाल्टचे काम करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नेमणूक करणे.**

**१६.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पूर्व व पश्चिम द्रुतगती महामार्ग खड्डेविरहित ठेवण्यास मास्टीक अस्फाल्ट वेअरींग कोटची तरतूद करण्यात आली असून त्यासाठी स्वतंत्रपणे निविदा मागवून कंत्राटदारांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर काम तांत्रिकदृष्टया उत्तम होण्यासाठी कुशल मनुष्यबळ असणा-या स्वतंत्र प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करणे आवश्यक असल्यामुळे, पूर्व द्रुतगती महामार्गावरील कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे.एस.एन.भोबे ॲंड असोसिएटस् यांची तसेच पश्चिम द्रुतगती महामार्गावरील कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे.एक्ससीसी इंजिनिअर्स ॲंड प्लानर्स यांची नेमणूक करण्यात आली आहे. मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी कार्यकारी समितीने यापूर्वी मान्यता दिलेल्या अर्हताप्राप्त सल्लागाराच्या यादीतून या २ सल्लागारांची नियुक्ती करण्यात आली असून या सल्लागारांची फी कार्यकारी समितीने मंजूर केलेल्या दरानुसार निश्चित करण्यात आलेली आहे. अर्हताप्राप्त सल्लागारांच्या यादीची वैधता डिसेंबर, २००५ मध्ये संपुष्टात आल्यामुळे मे.एस.एन.भोबे ॲंड असोसिएटस् व मे.एक्ससीसी इंजिनिअर्स ॲंड प्लानर्स यांच्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, मे.एस.एन.भोबे ॲंड असोसिएटस् यांना एकूण रु.५७,७९,२३२/- तसेच मे.एक्ससीसी इंजिनिअर्स ॲंड प्लानर्स यांना रु.५२,३७,८४१/- इतकी फी द्यावयाची आहे.

**१६.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१०५७ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या

..३२/-

अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व व पश्चिम द्रुतगती महामार्गावर मास्टीक ॲस्फाल्टचे काम करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून अनुक्रमे मे.एस.एन.भोबे अँड असोसिएट्स व मे.एक्ससीसी इंजिनिअर्स अँड प्लानर्स यांची खाली नमूद केलेल्या फी वर तसेच यापूर्वी नेमणूक केलेल्या सल्लागारांच्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार, नेमणूक करण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे. प्रत्यक्ष Manpower Deployment चे प्रमाणात आणि कामाचे भौतिक प्रगतीचे प्रमाणात प्रदाने सिमीत करणेबाबतची कार्यवाही महानगर आयुक्तांनी करावी.

| अ. क्र. | मार्गाचे नांव | नियुक्त सल्लागार | पॅकेज | टप्पा १ व २ | टप्पा-३ |
|---|---|---|---|---|---|
| १. | पूर्व द्रुतगती महामार्ग | मे.एस.एन.भोबे अँड असोसिएट्स | ११ व १२ | रु.२,८८,४५७/- (सदर शुल्क मे.एक्ससीसी इंजिनिअर्स अँड प्लानर्स यांना देय आहे.) | रु.२६,९२,२६७/- |
| २. | | मे.एस.एन.भोबे अँड असोसिएट्स | १३, १४, १५ | रु.३,३०,७४६/- (सदर शुल्क मे.एक्ससीसी इंजिनिअर्स अँड प्लानर्स यांना देय आहे.) | रु.३०,८६,९६५/- |
| ३. | पश्चिम द्रुतगती महामार्ग | मे.एक्ससीसी इंजिनिअर्स अँड प्लानर्स | १, २, ३, ४ | रु.२,५३,१९५/- | रु.२३,६३,१५६/- |
| | | मे.एक्ससीसी इंजिनिअर्स अँड प्लानर्स | ५, ६, १० | रु.१,९३,७७०/- | रु.१८,०८,५१७/- |

"

**बाब क्र.१७ : कोलेकल्याण, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व) येथील राज्य अग्निशमन ॲकॅडमीच्या इमारतीच्या बांधकामासाठीच्या प्राप्त झालेल्या लघुत्तम निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**

**१७.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कोलेकल्याण, विद्यानगरी, सांताक्रुझ (पू.) येथील राज्य अग्निशमन अकादमीच्या इमारतीचे बांधकाम ठेव स्वरुपात मिळणा-या निधीतून करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली आहे. त्यानुसार, सदर कामासाठी आतापर्यंत रु.९.२१ कोटी इतका निधी राज्य अग्निशमन अकादमीकडून प्राधिकरणास ठेव म्हणून प्राप्त झाला आहे. सदर कामासाठी इमारतीचा

..३३/-

आराखडा तयार करणे, खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे, कामाचे दैनंदिन पर्यवेक्षण करणे इत्यादी कामांसाठी मे.फिरोज कुडीयनवाला यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून कार्यकारी समितीच्या मान्यतेने नेमणूक करण्यात आली आहे. राज्य अग्निशमन अकादमीच्या इमारतीचे बांधकाम तसेच त्यातील विद्युत काम, उद्‌वाहनाचे काम, अग्निशमन यंत्रणा इत्यादी कामांचा एकूण अंदाजित खर्च रु.९.७० कोटी इतका आहे. या अंदाजित खर्चास प्राधिकरणाचे मुख्य अभियंता यांनी मान्यता दिलेली आहे. या कामासाठी वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. एकूण ५ कोरे निविदा संच विकले गेले व त्यानुसार एकूण ५ निविदा प्राप्त झाल्या. या निविदांची छाननी केली असता ३ निविदाकार पात्र ठरले. त्यापैकी मे.इगल कन्स्ट्रक्शन कंपनी यांचा अंदाजित खर्चापेक्षा २३.४०% अधिक दराचा देकार लघुत्तम आढळला. यासंबंधात मे.इगल कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याशी वाटाघाटी केल्या असता त्यांनी सादर केलेला सुधारीत देकार या कामाच्या अंदाजित खर्चापेक्षा २२.५०% इतका जास्त दराचा आहे. यासंबंधात महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, या कामाच्या अंदाजित खर्चामध्ये खिडक्यांच्या तावदानासाठी ५ मि.मी. जाडीची साधारण काच विचारात घेण्यात आली होती. परंतु निविदापूर्व बैठकीमध्ये राज्य अग्निशमन अकादमीच्या अधिका-यांनी साध्या काचेऐवजी टफन ग्लास घेण्यास सांगितले. तसेच इमारतीच्या समोरील भागातील इंजिन-बे भागात पहिल्या माळयाची उंची दुप्पट असल्यामुळे त्यास विशिष्ट प्रकारचे फॉर्मवर्क वापरावयाचे आहे. या सर्व बाबींमुळे निविदेत वाढीव दर प्राप्त झालेला आहे. मे.इगल कन्स्ट्रक्शन कंपनी यांचा लघुत्तम देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा, सुसंवादी व रास्त असल्यामुळे कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. या कामाचा संपूर्ण खर्च राज्य अग्निशमन अकादमीकडून ठेव स्वरुपात प्राधिकरणास प्राप्त होणा-या निधीतून करावयाचा आहे.

१७.२ चर्चेदरम्यान सदस्यांनी विचारणा केली असता श्री.रामचंदानी, मुख्य अभियंता, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी स्पष्ट केले की, या कामाचे अंदाजपत्रक सन २००५-०६ मधील दरसूचीवर आधारीत असून, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रचलित दरसूचीनुसार नसल्यामुळे तसेच उपरोक्त तरतुदींमुळे अंदाजित खर्चापेक्षा वाढीव दराच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यांनी पुढे असेही सांगितले की, या इमारतीचे बांधकाम सुमारे २४ महिन्यात पूर्ण होईल.

..३४/-

१७.३ चर्चेनंतर, कार्यकारी समितीने असे ठरविले आहे की, सदर इमारतीचे बांधकाम २४ महिन्यांऐवजी १८ महिन्यात पूर्ण करण्याचे प्रयत्न करावेत.

१७.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला : –

ठराव क्र.१०५८ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे राज्य अग्निशमन अकादमीच्या कोलेकल्याण, विद्यानगरी, सांताक्रुझ (पू) येथील नियोजित इमारतीच्या बांधकामासाठी मे.इगल कन्स्ट्रक्शन कंपनी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.५०% जास्त दराची म्हणजे रु.११,८८,३२,२८३.८५ (रुपये अकरा कोटी अठ्ठयाऐंशी लाख बत्तीस हजार दोनशे त्र्याऐंशी आणि पंच्याऐंशी पैसे मात्र) किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१८ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील कार्यान्वित होत असलेल्या मुंबई नागरी परिवहन प्रकल्प तसेच मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पातील कामांना वाढीव दर देण्यासंबंधी प्रस्ताव तपासणीसाठी समितीचे गठन करण्यास मंजूरी देणेबाबत.**

१८.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत ४० कामे व मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत ४ कामे कंत्राटदारांच्या नेमणूका करुन हाती घेतली आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य

रस्ते विकास महामंडळाकडून काही उड्डाणपूलांची कामे सुरु आहेत. यातील बहुतेक कामे सन २००३-०४ मध्ये सुरु करण्यात आली. कंत्राटानुसार कामे पूर्ण करण्याचा मूळ कालावधी १२ ते १८ महिने इतका होता. त्यामधील बरीचशी कामे जवळजवळ पूर्ण होत आली आहेत. तथापि, अतिक्रमणे हटविणे, जलवाहिन्यांचे स्थलांतर करणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्राप्त झालेल्या शे-यांची पूर्तता करणे इत्यादी कारणांमुळे सुमारे १५ कामांची प्रगती आतापर्यंत ५०% पेक्षा कमी आहे. अशा ज्या कामांची प्रगती ५०% पेक्षा कमी आहे त्या कामांच्या काही कंत्राटदारांनी उर्वरीत कामे मूळ निविदेतील दरानुसार करण्यास असमर्थता दर्शविली असून नवीन दराची मागणी केलेली आहे. बांधकाम सामुग्री, यंत्रसामुग्री तसेच काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर बाबींच्या दरांमध्ये अनपेक्षितरीत्या वाढ झाली असल्याने कंत्राटातील भाववाढीसंबंधीच्या तरतूदींचा उपयोग करुन केलेल्या कामाचा योग्य मोबदला मिळत नसल्यामुळे कंत्राटदार नवीन दराची मागणी करीत आहेत. अशा कामांचे कंत्राट रद्द (foreclose) करुन नव्याने निविदा मागवून पूर्ण करण्याऐवजी नवीन सुधारीत वाजवी दर, तज्ञ व स्वतंत्र सदस्यांमार्फत तपासून शिफारस करण्यासाठी समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. सदर समिती दरवाढीचे प्रस्ताव तपासताना झालेली भाववाढ, कामाच्या व्याप्तीत झालेली वाढ इत्यादी बाबी तपासून पाहील.

**१८.२** महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, प्रस्तावित समितीमध्ये प्राधिकरणाचे मुख्य लेखा अधिकारी व वित्त सल्लागार यांचा सदस्य म्हणून समावेश करणे आवश्यक आहे.

**१८.३** चर्चेदरम्यान, श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी सूचना केली की, जर कामाच्या विलंबास कंत्राटदार जबाबदार असेल तर जादा दर देणे उचित होणार नाही. म्हणून विलंबाची कारणे तपासून पहाणे आवश्यक आहे. तसेच प्रस्तावित समितीच्या टर्म्स् ऑफ रेफरन्स योग्यरीतीने निश्चित करणे आवश्यक आहे.

**१८.४** श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, काम पूर्ण करण्याचा मूळ कालावधी वास्तववादी दृष्टिकोनातून निश्चित करणे आवश्यक आहे, अन्यथा वाढीव दराची मागणी वारंवार पुढे येत राहील.

..३६/-

**१८.५** चर्चेनंतर, कार्यकारी समितीने असे ठरविले की, कंत्राटदारांकडून प्राप्त होणा-या दरवाढीचे प्रस्ताव तपासून शिफारस करण्यासाठी गठीत करावयाच्या समितीमध्ये श्री.पी.व्ही.कामत, माजी सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाचे अन्य माजी सचिव यांचा सदस्य व तांत्रिक सल्लागार म्हणून समावेश करण्यात यावा. तसेच प्राधिकरणातील कार्यरत सल्लागारांच्या प्रतिनिधीला समितीवर सदस्य म्हणून न घेता निमंत्रित म्हणून घेण्यात यावे. कार्यकारी समितीने पुढे असेही ठरविले की, कंत्राटात नमूद नसलेल्या अतिरिक्त बाबी (extra items) किंवा कंत्राटातील बाबींच्या परिमाणामध्ये वाढ (excess quantity) यामुळे कामाच्या खर्चामध्ये मंजूर रक्कमेच्या २०% पेक्षा जास्त वाढ झाल्यास तसेच याव्यतिरिक्त इतर बाबींमुळे कामाच्या खर्चामध्ये वाढ झाल्यास अतिरिक्त खर्चासाठी कार्यकारी समितीची मान्यता घेण्यात यावी.

**१८.६** त्यानंतर, कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :—

**ठराव क्र.१०५९ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प तसेच प्राधिकरणाच्या इतर प्रकल्पांतर्गत ज्या कामांची प्रगती ५०% पेक्षा कमी आहे अशा कामांचे करारनामे संपुष्टात आणणे किंवा पर्याय म्हणून सुधारीत वाजवी दर प्रस्तावित करण्यासाठी खालीलप्रमाणे समितीचे गठन करण्यास मान्यता देत आहे :-

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | महानगर आयुक्त | - | अध्यक्ष |
| (२) | सह-महानगर आयुक्त | - | सदस्य |
| (३) | श्री.एस.आर.तांबे, माजी सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग | - | सदस्य व तांत्रिक सल्लागार |
| (४) | श्री.पी.व्ही.कामत<br>माजी सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग<br>किंवा<br>अन्य समकक्ष माजी सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग | - | सदस्य व तांत्रिक सल्लागार |

(५) मुख्य लेखा अधिकारी व वित्त सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण - सदस्य

(६) प्रकल्पांशी संबंधित नसलेले मुख्य अभियंता - सदस्य सचिव

(७) प्राधिकरणातील कार्यरत सल्लागारांचे प्रतिनिधी - निमंत्रित

कंत्राटात नमूद नसलेल्या अतिरिक्त बाबी (extra items) किंवा कंत्राटातील बाबींच्या परिमाणामध्ये वाढ (excess quantity) यामुळे कामाच्या खर्चामध्ये मंजूर रक्कमेच्या २०% पेक्षा जास्त वाढ झाल्यास तसेच या व्यतिरिक्त इतर बाबींमुळे कामाच्या खर्चामध्ये वाढ झाल्यास वरील समितीकडून प्राप्त झालेल्या शिफारशीनुसार अतिरिक्त खर्चासाठी कार्यकारी समितीची मंजूरी घेण्यात यावी.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील समितीच्या टर्म्स् ऑफ रेफरन्स निश्चित करण्यास तसेच वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१९ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांसाठी बांधण्यात आलेल्या कायमस्वरुपी निवासी गाळयांच्या ठिकाणी घनकचरा डबे पुरविण्याचे काम करुन घेण्याबाबतचे अधिकार महानगर आयुक्तांना प्रत्यायोजित करणेबाबत.**

१९.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पामुळे सुमारे २०,००० कुटुंबे बाधित होत असून त्यांच्या पूनर्वसनासाठी मानखुर्द, अणिक, मजास, आजगांवकर प्लॉट, कांजूरमार्ग इत्यादी ठिकाणी कायमस्वरुपी सदनिका बांधण्यात आल्या असून वेगवेगळया २१ ठिकाणी प्रकल्पग्रस्त कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. या वसाहतीमध्ये राहणा-या प्रत्येक सदनिकाधारकांनी त्यांच्या निवासात ओल्या व सुक्या कच-यासाठी दोन स्वतंत्र कचरा डब्यांची व्यवस्था करणे व तो वेगळा गोळा करणे अनिवार्य असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे. तसेच सर्व वसाहतीतील गोळा केलेला घनकचरा सुक्या व ओल्या कच-यासाठी ठेवलेल्या स्वतंत्र डब्यात साठविणे व तो निर्देशित केलेल्या वेळी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या गाडीला उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. यासाठी घनकचरा व्यवस्थापन मार्गदर्शन पुस्तिकेनुसार प्रत्येक वसाहतीत लोकसंख्येच्या घनतेनुसार

लागणा-या कचरा डब्यांची संख्या ठरविण्यात आली असून त्यानुसार वेगवेगळया वसाहतीत एकूण ३२४ डबे पुरविणे आवश्यक आहे व त्यासाठी सुमारे रु.१.०५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पामुळे बाधित होणा-या कुटुंबांच्या पुनर्वसनासंबंधी शासनाने नियुक्त केलेल्या स्वतंत्र नियंत्रण यंत्रणेच्या अध्यक्षांनी तसेच जागतिक बँकेने पुनर्वसन वसाहतीमध्ये घनकच-याचे डबे ठेवण्यास सांगितले आहे. जागतिक बँकेच्या अर्थसहाय्यातून डबे पुरविण्याचे काम करावयाचे झाल्यास त्यास कमीतकमी ६ महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. म्हणून सदर डब्यांचा खर्च प्रतिभाग निधीतून करण्याचे प्रस्तावित असून त्या खर्चाचे समायोजन संबंधित यंत्रणेच्या प्रकल्पबाधित कुटुंबांच्या संख्येनुसार करण्यात येईल. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, ३२४ घनकचरा डबे तातडीने पुरविण्याची निकड लक्षात घेता बृहन्मुंबई महानगरपालिकेस EN दर्जाचे गॅल्व्हनाईज्ड घनकचरा डबे पुरविणा-या नोंदणीकृत/अधिकृत पुरवठादारांकडून लघुत्तम दरावर घनकचरा डबे सदर कंत्राटातील तरतूदीनुसार खरेदी करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रत्यायोजित करण्यात यावेत असा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

१९.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :—

**<u>ठराव क्र.१०६०</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (५) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांसाठी बांधण्यात आलेल्या कायमस्वरुपी निवासी गाळयांकरीता घनकचरा डबे रु.१.०५ कोटी इतक्या अंदाजित खर्चास बृहन्मुंबई महानगरपालिकेतील नोंदणीकृत/अधिकृत पुरवठादाराकडून लघुत्तम दरावर तसेच सदर कंत्राटातील तरतुदींनुसार खरेदी करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रत्यायोजित करीत आहे."

**<u>बाब क्र.२० :</u>** **<u>पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या सुधारणा व रुंदीकरणांतर्गत पॅकेज क्र.७, ८ व ९ मधील (साखळी क्र.५१०/३५० ते ५०४/०००) उर्वरीत सेवारस्ते व भोर येथे वाहतूक भुयारी मार्गाच्या निविदेस मंजूरी देणे.</u>**

२०.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या प्राधान्यक्रम-१ अंतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गावरील मालाड ते दहिसर या भागातील पॅकेज क्र. ७, ८ व ९ मधील (साखळी क्र.५१०/३५० मी. ते ५०४/०० मी.) कामे यापूर्वी मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांना देण्यात आली होती. तथापि, अतिक्रमणे, सेवावाहिन्यांचे स्थलांतर इत्यादी बाबींमुळे काम विहित कालावधीत पूर्ण न झाल्यामुळे सदर कंत्राटदाराकडून कामे काढून घेण्यात आली. तसेच उर्वरीत कामांसाठी स्वतंत्रपणे निविदा मागवून विहित पध्दतीप्रमाणे मे.जे.कुमार अँड कंपनी यांना कंत्राटदार म्हणून नेमण्यात आले. दरम्यान रस्त्यावर वारंवार पडणारे खड्डे व त्यामुळे जनतेत वाढणारा रोष यावर तोडगा काढण्याच्या दृष्टीने अस्फाल्ट कॉंक्रीट ऐवजी सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते तसेच सेवावाहिन्यांच्या जागी व जंक्शनवर पेव्हर ब्लॉक बसविण्याचे ठरविण्यात आले. तसेच पावसाळी पाण्याचा निचरा जलदगतीने होण्यासाठी आकुर्ली व ठाकूर संकुल येथे अतिरिक्त वाहिनी टाकणे आणि दत्तपाडा उड्डाणपूलाजवळ ३ सी.डी.ची अतिरिक्त कामे करण्यात आली. त्याचप्रमाणे टाईम्स ऑफ इंडिया व कुलुपवाडी येथे सुरक्षिततेच्या दृष्टीने अधिक प्रमाणात डोंगर तोडणी करावी लागली. या सर्व अतिरिक्त बाबींचा एकूण खर्च मूळ निविदा किंमतीच्या २०% पेक्षा जास्त होत असल्यामुळे मूळ निविदेतून उर्वरित सेवा रस्ते व भोर येथील वाहतूक भूयारी मार्ग वेगळा करण्यात आला. या उर्वरीत सेवा रस्ते व भोर येथील वाहतूक भूयारी मार्गाच्या कामांचा एकूण अंदाजित खर्च रु. २४३१.१९ लाख इतका आहे. हा अंदाजित खर्च मूळ अंदाजपत्रकातील दरानुसार तयार करण्यात आला असून मूळ करारनाम्यातील म्हणजेच सन २००३ चा भाववाढ निर्देशांक पायाभूत मानण्यात आला आहे. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, या कामासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. एकूण ११ कोरे निविदा संच विकले गेले व त्यापैकी विहित कालावधीमध्ये ५ पूर्ण केलेल्या निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.००% जास्त दराची निविदा लघुत्तम असून वाटाघाटीनंतर त्यांनी सादर केलेला सुधारीत देकार अंदाजपत्रकीय

..४०/-

दरापेक्षा १२.९८% जास्त दराचा म्हणजे रु.२७,४६,७५,९८७/- इतका आहे. सदर देकार विद्यमान दरसूचीनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.९२% जास्त दराचा आहे. सदर सुधारीत लघुत्तम देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा, सुसंवादी व रास्त असल्यामुळे कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

२०.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.१०६१ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या सुधारणा व रुंदीकरणांतर्गत पॅकेज क्र.७, ८ व ९ मधील (साखळी क्र.५१०/३५० मी. ते ५०४/००० मी.) उर्वरीत सेवारस्ते व भोर येथे वाहतूक भूयारी मार्ग बांधणे या कामासाठी मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.९८% जास्त दराची म्हणजे रु.२७,४६,७५,९८७/- (रुपये सत्तावीस कोटी सेहेचाळीस लाख पंच्याहत्तर हजार नऊशे सत्त्याऐंशी मात्र) किंमतीची सुधारीत लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.२१ : वडाळा भारवाहक तळामधील माहिती कक्ष ते पेट्रोल पंप या रस्त्यावर ८० मि.मी. जाडीचे पेव्हर ब्लॉक बसविण्याची निविदा मंजूर करणेबाबत.**

२१.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वडाळा भारवाहक तळाच्या मुख्य प्रवेशद्वारावरील माहिती कक्ष ते पेट्रोल पंप या रस्त्यावरुन मोठया

प्रमाणात वाहनांची रहदारी होते. भक्तीमार्ग येथील रहिवासी तसेच पूर्व द्रुतगती महामार्गावरील जड वाहनेही या रस्त्याचा वापर करतात. त्याचप्रमाणे वडाळा भारवाहक तळ येथे गाडयांचा वजनकाटा असल्यामुळे या रस्त्यावरुन मोठया प्रमाणात ट्रकची रहदारी चालू असते. सदरहू रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग खराब झाल्यामुळे वाहतूकीस अतिशय त्रास होतो. म्हणून वडाळा भारवाहक तळामधील माहिती कक्ष ते पेट्रोल पंप या ५८० मीटर लांबीच्या व १० मीटर रुंदीच्या रस्त्यावर ८० मि.मी. जाडीचे पेव्हर ब्लॉक बसविण्याचे ठरविण्यात आले आहे. त्यासाठी लेव्हलिंग कोर्ससाठी वेट मिक्स मॅकॅडमचा वापर करावयाचा असून त्यावर मजबूतीकरीता डी.एल.सी. व पेव्हर ब्लॉक इत्यादींचा वापर करावयाचा आहे. शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २००६-०७ च्या दरसूचीनुसार या कामाचा अंदाजित खर्च रु.९७,२७,५००/- इतका आहे. या कामासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. एकूण ८ कोरे निविदा संच विकले गेले. तथापि, विहीत कालावधीमध्ये ३ पूर्ण केलेल्या निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांची छाननी केली असता मे.देवांग कन्स्ट्रक्शन कंपनी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.००% जास्त दराची निविदा लघुत्तम असून वाटाघाटीनंतर सदर लघुत्तम निविदाकारांनी सादर केलेला सुधारीत देकार अंदाजपत्रकीय दराइतका आहे. हा सुधारीत लघुत्तम देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा, सुसंवादी व रास्त असल्यामुळे कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

**२१.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.१०६२ :**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे वडाळा भारवाहक तळामधील माहिती कक्ष ते पेट्रोल पंप या रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामासाठी मे.देवांग कन्स्ट्रक्शन कंपनी यांची अंदाजपत्रकीय दराची म्हणजे रु.९७,२७,५००/- (रुपये सत्त्याण्णव लाख सत्तावीस हजार पाचशे मात्र) किंमतीची

..४२/-

लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.२२ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प - सर्वंकष अभियांत्रिकी आराखडे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची मुदत वाढविणे इत्यादीबाबत.**

**२२.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाकरीता सर्वंकष अभियांत्रिकी आराखडे व प्रकल्प व्यवस्थापन यासाठी सल्लागारांची नेमणूक करण्यास तसेच गटवारी 'अ' (रस्त्यांची कामे) व 'ब' (उड्डाणपूल) मध्ये येणा-या कामांसाठी २५ सल्लागारांची निवड करण्यास व सल्लागारांच्या देय शुल्कास यापूर्वी कार्यकारी समितीने मान्यता दिली आहे. तसेच दिनांक २४ डिसेंबर, २००४ रोजी झालेल्या २१० व्या बैठकीत कार्यकारी समितीने या सल्लागारांच्या प्रस्तावांची वैधता डिसेंबर, २००५ पर्यंत वाढविण्यास मान्यता दिली आहे. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, कार्यकारी समितीच्या मान्यतेने रस्त्यांच्या विकासाची ४० कामे व ६ उड्डाणपूलांची कामे हाती घेण्यात आली आहेत. प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन, भूसंपादन, सेवावाहिन्यांचे स्थलांतर, विविध संस्थांच्या परवानग्या इत्यादी कारणांमुळे सदर कामे पूर्ण करण्यास विलंब झाला असून आता ही कामे डिसेंबर, २००७ अखेरपर्यंत पूर्ण होतील अशी अपेक्षा आहे. म्हणून सर्वंकष अभियांत्रिकी आराखडे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लामसलतीकरीता सल्लागारांच्या प्रस्तावाची वैधता डिसेंबर, २००७ अखेरपर्यंत वाढविणे आवश्यक आहे. तसेच संबंधीत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या नेमणूकीचा कालावधी वाढवून करारनाम्यातील तरतूदीनुसार त्यांना अतिरिक्त कालावधीसाठी फी अदा करणे आवश्यक आहे. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, काही सल्लागारांचे काम असमाधानकारक असल्यामुळे त्यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत तर काही सल्लागार काम सोडून गेले आहेत. म्हणून कार्यकारी समितीने यापूर्वी मान्यता दिलेल्या सल्लागारांच्या

निवड यादीतील सल्लागारांपैकी समाधानकारक काम करणा-या व पूर्वानुभव असलेल्या सल्लागारांची निवड करुन प्रकल्प व्यवस्थापनाचे उर्वरीत काम पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या कामाच्या अतिरिक्त कालावधीसाठी फी ठरविण्याचे व त्यानुसार देयके अदा करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रत्यायोजित करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे जानेवारी, २००८ नंतर सुरु करण्यात येणा-या कामांकरीता योग्य ती पध्दत अवलंबून नवीन सल्लागारांची निवड करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रत्यायोजित करण्यात यावेत अशी कार्यकारी समितीस विनंती करण्यात आली आहे.

२२.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.१०६३ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी सर्वंकष अभियांत्रिकी आराखडे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लामसलतीकरीता सल्लागारांच्या प्रस्तावांची वैधता डिसेंबर, २००७ अखेरपर्यंत वाढविण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वाढीव कालावधीत सदर सल्लागारांना अतिरिक्त कालावधीसाठी फी ठरवून त्यानुसार देयके अदा करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** जानेवारी, २००८ नंतर घेण्यात येणा-या कामांकरीता योग्य ती पध्दत अवलंबून सल्लागारांची निवड करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.२३ : ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमास (TMTU) ८७ सी.एन.जी. बसेस खरेदी करण्याकरीता वित्तीय सहाय्य.**

२३.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, दिनांक ३० नोव्हेंबर, १९९५ रोजी झालेल्या १६६ व्या बैठकीत आणि दिनांक १३ नोव्हेंबर, १९९७ रोजी झालेल्या १७६ व्या बैठकीत ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रमास प्राधिकरणाच्या राखीव निधीतून अनुक्रमे रु.३.२५ कोटी व रु.३.२० कोटी इतके कर्ज देण्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली होती. ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रमाने या दोन्ही कर्जाची व्याजासह परतफेड केली आहे. आता ८७ नवीन सी.एन.जी. बसेस खरेदी करण्यासाठी प्राधिकरणाच्या राखीव निधीतून रु.१७ कोटीचे कर्ज देण्याची विनंती ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रमाने केलेली आहे. या विनंतीबाबत तांत्रिक व वित्तीय मूल्यमापन प्राधिकरणातर्फे करण्यात आले आहे. ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रमाची आर्थिक परिस्थिती समाधानकारक नाही. या उपक्रमास गेल्या ५ वर्षात रु.१३.९७ कोटीचे अनुदान ठाणे महानगरपालिकेने दिलेले आहे. ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रमाने प्राधिकरणाकडून रु.१७ कोटी इतके कर्ज घेण्यास ठाणे महानगरपालिकेने मान्यता दिली आहे. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, सदरहू कर्जाचा करार ठाणे महानगरपालिकेशी करण्यात येईल तसेच कर्जाची व व्याजाची परतफेड करण्याची संपूर्ण जबाबदारी ठाणे महानगरपालिकेची असेल. यानुसार, ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रमास द.सा.द.शे. ८% दराने तसेच बाब टिप्पणीत नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार रु.१७ कोटी इतके कर्ज प्राधिकरणाच्या राखीव निधीतून देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

२३.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.१०६४ :**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (राखीव निधीमधून कर्ज मंजूरी) विनियम, १९९२ च्या विनियम क्रमांक ७.१ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर

..४५/-

करुन, कार्यकारी समिती याद्वारे खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून ठाणे महानगरपालिकेच्या ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रमास विलंब कालावधीच्या सुविधांशिवाय व पाच वर्षामध्ये परतफेड करावयाच्या अटींवर ८७ नवीन बसेस खरेदी करण्यासाठी द.सा.द.शे. ८% दराने रु.१७ कोटी इतके कर्ज देण्यास मान्यता देत आहे :-

(१) स्थानिक संस्था कर्ज अधिनियम, १९१४ नुसार ठाणे महानगरपालिका व ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रमाने कर्ज उभारणीसाठी शासनाची पूर्वमंजूरी घेणे आवश्यक राहील.

(२) कर्जाची एकूण रक्कम रु.१७.०० कोटीपेक्षा जास्त असणार नाही.

(३) कर्ज परतफेडीची मुदत प्रत्येक वितरीत हप्त्यासाठी पाच वर्षांपेक्षा जास्त असणार नाही व त्याला विलंब कालावधीची (moratorium) सवलत उपलब्ध असणार नाही.

(४) कर्ज करारनामा करण्यापूर्वी ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे खाते ज्या बँकेत आहे त्याच बँकेत, ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रम व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या संयुक्त नावावर एस्क्रो खाते (Escrow A/c) उघडणे आवश्यक राहील. ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या ज्या खात्यामध्ये प्रवाशांकडून मिळणारी रक्कम भरणा केली जाते त्या खात्यामधून दरदिवशी रक्कम रु.१.३० लाख इतकी रक्कम एस्क्रो खात्यामध्ये वर्ग करण्यासंबंधी ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रम बँकेस सूचना देईल. सदर खात्यातून प्राधिकरणाच्या कर्जाची परतफेड व व्याज भरणा व्यतिरिक्त मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या पूर्व लेखी परवानगीशिवाय पैसे काढता येणार नाहीत. ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रमाने प्राधिकरणाबरोबर योग्य तो करार करणे आवश्यक आहे.

(५) प्राधिकरणाच्या कर्जाच्या परतफेडीची जबाबदारी ठाणे महानगरपालिकेवर राहील. कर्ज परतफेडीबरोबर भांडवली खर्चासाठी ठाणे महानगरपालिकेने ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रमाला पुढील पाच वर्षात प्रतिवर्षी रु.४ कोटी अनुदान देणे बंधनकारक राहील. त्यासाठी ठाणे महानगरपालिका तसेच ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रमाने वार्षिक अर्थसंकल्पात कर्ज परतफेड, व्याजाचा भरणा व भांडवली खर्चासह आवश्यक ती तरतूद करणे बंधनकारक राहील.

(६) कर्जाची परतफेड होईपर्यंत नव्याने खरेदी करण्यात आलेल्या बसेस या प्राधिकरणाच्या नावावर वर्गबध्द (Hypothecate) कराव्या लागतील.

(७) प्राधिकरणाच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रमाने कोणत्याही अन्य स्त्रोताकडून कर्ज घेऊ नये.

(८) आवश्यकता भासल्यास कर्ज रक्कमेतून करण्यात येणा-या कामांच्या प्रगतीचा आढावा व तपासणी तसेच लेखा परिक्षण करण्यासाठी प्राधिकरणाच्या प्रतिनिधींना ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रमाने आवश्यक त्या सर्व सोयी उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

(९) ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रमातर्फे करण्यात येणा-या बस खरेदीच्या निविदा प्रक्रियेत प्राधिकरणातर्फे प्रतिनिधीत्वासाठी प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांचा समावेश करुन घ्यावा. तसेच बस खरेदीच्या प्रस्तावास महानगर आयुक्तांची मान्यता घेणे ठाणे महानगर परिवहन प्रकल्पास बंधनकारक राहील.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.२४ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात येणा-या नवीन योजनांबाबत.**
**१) मोनोरेल प्रकल्प**
**२) उन्नत पादचारी मार्ग (Elevated pedestrian Sky walk)**

मोनोरेल व उन्नत पादचारीमार्ग या प्रस्तावित प्रकल्पांसंबंधीच्या टिप्पणीची नोंद घेऊन कार्यकारी समितीने निदेश दिले की, सदर प्रस्तावित प्रकल्पांसंबंधात एक सविस्तर सादरीकरण कार्यकारी समितीच्या आगामी बैठकीत करण्यात यावे.

**बाब क्र.२५ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प व मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत रस्त्यांची कामे - रस्त्यालगतच्या जलवाहिनी टाकण्याच्या करारनाम्याअंतर्गत जलवाहिनी टाकण्याचे काम करणेबाबत - सुधारीत खर्चास मंजूरी देणेबाबत.**

**२५.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत मुंबईच्या पूर्व व पश्चिम उपनगरातील जलवाहिन्या टाकण्याच्या भाग-१ ते ४ मधील कामांच्या एकूण रु.२०७७.४७ लाख इतक्या खर्चास दिनांक २४ डिसेंबर, २००४ रोजी झालेल्या २१० व्या बैठकीत कार्यकारी समितीने मान्यता दिली होती. त्यानुसार, सहार रस्ता, अंधेरी-घाटकोपर जोडरस्ता, मरोळ-मरोशी रस्ता, महाकाली

रस्ता, बी.डी.सावंत रस्ता, साकी-विहार रस्ता, मुख्य जोडरस्ता, पश्चिम द्रुतगती महामार्ग इत्यादी ठिकाणी जलवाहिन्या टाकण्याची सुमारे २४.४२ कि.मी. लांबीची सर्व कामे पूर्ण करण्यात आली. तथापि, रु.१८५०.४० लाख इतक्या मंजूर लघुत्तम निविदा रक्कमेपेक्षा या कामांचा एकूण खर्च १४.९९% जास्त म्हणजे रु.२१२७.९४ लाख इतका झाला. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, पूर्व व पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या रुंदीकरणाची कामे याच वेळेला प्रगतीपथावर असल्याने, संबंधीत मुख्य कंत्राटदाराकडून अतिरिक्त दावे टाळण्यासाठी त्या भागातील जलवाहिन्यांचे स्थलांतर करणे, नविन जलवाहिन्या टाकणे व नवीन कनेक्शन स्थापित करणे इत्यादी कामे वेळेत पूर्ण करुन घेणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे, मुंबई मेट्रोशी संबंधीत मार्ग म्हणजेच अंधेरी-घाटकोपर जोडरस्ता व इतर महत्वाच्या मार्गाच्या रुंदीकरणातील अडथळे दूर करणे आवश्यक होते. त्यासाठी जलवाहिन्यांची अतिरिक्त कामे उपलब्ध कंत्राटदाराकडून करुन घेण्यात आली. या अतिरिक्त कामांसाठी रु.६,०७,६८,६३९/- इतका खर्च झालेला आहे. अशाप्रकारे जलवाहिन्या टाकण्याच्या कामासाठी एकूण रु.२७,३५,६२,६३९/- इतका खर्च झालेला आहे.

**२५.२** महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांकरीता बांधण्यात येणा-या कायमस्वरुपी निवासी गाळयांकरीता रस्ते, पाणीपुरवठा, मलनिःसारण इत्यादी बाहय पायाभूत सुविधांकरिता एकूण रु.२०.९५ कोटी खर्चाच्या कामांना दिनांक १६ फेब्रुवारी, २००४ रोजी झालेल्या २०५ व्या बैठकीत कार्यकारी समितीने मान्यता दिली होती. या कामांतर्गत जलवाहिन्या टाकण्याच्या कामासाठी (मुंबई-२) मे.एस.बी.खकाळ यांची रु.२,८२,४२,५००/-किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास कार्यकारी समितीने दिनांक १६ फेब्रुवारी, २००४ रोजी झालेल्या २०५ व्या बैठकीत मान्यता दिली होती. या कामांसाठी एकूण रु.१,९७,२४,३२६/- इतका खर्च झालेला आहे. या कामांमध्ये समाविष्ट असलेल्या मानखुर्द व मजास येथील कामांव्यतिरिक्त ओशिवरा येथील निवासी गाळयांकरीता जलवाहिन्या टाकण्याचे तातडीचे काम मे.एस.बी.खकाळ यांच्याकडून त्यांच्या निविदेतील दराप्रमाणे पूर्ण करुन घेण्यात आले. यासाठी रु.१,८६,७५,६७४/- इतका अतिरिक्त खर्च झालेला आहे. अशारीतीने मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत मुंबईच्या पूर्व व पश्चिम उपनगरातील जलवाहिन्या

..४८/-

टाकण्याच्या भाग-१ ते ४ मधील कामांसाठी एकूण रु.२७,३५,६२,६३९/- इतका खर्च झाला असून मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांकरीता बांधलेल्या कायमस्वरुपी गाळयांसाठी जलवाहिन्या टाकण्याच्या कामासाठी (मुंबई-२) रु.३,८३,९४,५५९/- इतका खर्च झालेला आहे. अशारितीने झालेल्या या खर्चास मान्यता द्यावी अशी कार्यकारी समितीस विनंती करण्यात करण्यात आली आहे.

२५.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.१०६५ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत मुंबईच्या पूर्व व पश्चिम उपनगरातील जलवाहिन्या टाकण्याच्या भाग-१ ते ४ मधील कामांच्या रु.२७,३५,६२,६३९/- इतक्या सुधारीत खर्चास तसेच मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत हाती घेतलेल्या निवासी गाळयांकरीता बाहय पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी जलवाहिन्या टाकणे (मुंबई-२) या कामाच्या रु.३,८३,९४,५५९/- इतक्या सुधारीत खर्चास मान्यता देत आहे."

•

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

——— ०००००००००००० ———